अध्याय सोळावा.

श्रीगणेशायनमः ॥ ॥ ॐनमो सद्गुरु श्रीमूर्ती । चराचर तुझी विभूति । विश्वात्मा विश्वस्फूर्ती । अमूर्तमूर्ती श्रीगुरुराया ॥ १ ॥ तुझे मूर्तीचें महिमान । सकळ शास्त्रां अतर्क्य जाण । श्रुतीनें घेतलें मौन । शब्दें आण वाहिली ॥ २ ॥ आण वाहिली दृष्टांतीं । तुजसमान नाहीं दुजी स्थिति । जे जे योजावी उपपत्ती । ते ते विभूती पैं तुझी ॥ ३ ॥ तुझिया प्रभावाची ऐशी खोडी । जे दुजेपणाचें मूळ तोडी । मग एकपणाचे परवडी । दृष्टांत काढी कोण कोठें ॥ ४ ॥ कोठें तुझें स्थान मान । हेंही सर्वथा न कळे जाण । अगाध तुझें महिमान । कैसेनि ध्यान धरावें ॥ ५ ॥ हेतु मातु दृष्टांतू । न रिघे ज्याचे शिंवे-आंतू । तो भागवतींचा भागवतार्थू । वोवियांतू बोलविशी ॥ ६ ॥ ते माझे मन्हाटे आरिख बोल । सद्गुरूंनीं केले सखोल । तेथींच्या प्रेमाचे जे वोल । जाणती केवळ गुरुभक्त ॥ ७ ॥ ज्यासी नाहीं गुरुचरणीं भक्ती । त्यासी कैसेनि होईल विरक्ती । जरी पढले श्रुतिस्मृती । शास्त्रव्युत्पत्ती केल्याही ॥ ८ ॥ करितां साधनांच्या कोटी । साधनीं समाधान नुठी । झालिया सद्गुरुकृपादृष्टी । ब्रह्मत्वें पुष्टी गुरुभक्तां ॥ ९ ॥ तो तूं सद्गुरु श्रीजनार्दन । सकळ जगाचें अधिष्ठान । भूतीं भूतात्मा तूं आपण । सहजें जाण समसाम्यें ॥ १० ॥ समसाम्य सर्व भूतीं । ज्यांसी घडे सद्गुरुभक्ती । तेचि ये श्रीमहाभागवतीं । अर्थप्राप्ती प्रविष्ट ॥ ११ ॥ झालिया सद्गुरुकृपा वरिष्ठ । न करितां व्युत्पत्तीचे कष्ट । भागवतार्थी होय प्रविष्ट । भक्त सुभट भावार्थी ॥ १२ ॥ हृदयीं झालिया सद्भावो । भावें प्रकटे देवाधिदेवो । तेथें भागवताचा अभिप्रावो । सहजेंचि पहावो ठसावे ॥ १३ ॥ यालागीं करितां गुरुभक्ती । प्राप्त होइजे भागवतार्थी । तेथ काव्यादि

ॐ नमः । सद्गुरु श्रीमूर्तीला नमस्कार असो. हे श्रीगुरुराया ! हें सर्व चराचर जगत् तुझेंच स्वरूप आहे. विश्वाचा आत्मा तूंच व त्याचें स्फुरणहि तूंच आहेस. अमूर्त व मूर्त दोन्ही तूंच आहेस. १ तुझ्या मूर्तीचा महिमा सगळ्या शास्त्रांना अगम्य झाला, श्रुतीनें मौन धरिलें व शब्दांनीं शपथ वाहिली. २ तुला देण्यासारखी उपमाच नाहीं, म्हणून दृष्टांतानेंहि आण वाहिली. उपमेसाठीं जें पुढें करावें, तें तुझें स्वरूपच असतें. ३ तुझ्या प्रभावाची संवयच अशी आहे कीं, ती दुजेपणाचें मूळच तोडून टाकिते; तेव्हां मग एकपणाच्या जमावांत दृष्टांत तरी कोण कोठून आणणार ! ४ बरें, तुझें ठिकाण कोठें आहे, तेंहि कळत नाहीं. तुझा महिमा अगाध आहे, तेव्हां तुझें ध्यान कसें धरावें ! ५ ज्याच्या सीमेंत हेतु, शद्ब व उपमा प्रवेश करूं शकत नाहींत, तो तूं भागवताचा अर्थ ओंव्यांच्या द्वारां बोलवीत आहेस. ६ माझे ते असंबद्ध मराठी बोल सद्गुरूनें गंभीर केले. त्यांतील प्रेमाचा ओलावा केवळ गुरुभक्तच जाणतात. ७ ज्यांची गुरुचरणांवर भक्ति नाहीं, ते श्रुति-स्मृति-शास्त्र कितीहि पढले तरी त्यांना विरक्ति कोठून येणार ! ८ कोट्यवधि साधनें जरी आचरिलीं तरी त्या साधनांनीं खरें समाधान प्राप्त होत नाहीं; पण सद्गुरूच्या कृपादृष्टीनें गुरुभक्ताला ब्रह्मत्वाची पुष्टि मिळते. ९ असा तूं सद्गुरु जनार्दन, सगळ्या जगाचें अधिष्ठान आहेस. स्वाभाविक ऐक्यानें तूं सर्व भूतांतील भूतात्मा आहेस. १० ज्यांस सद्गुरूची भक्ति घडते, ते सर्व भूतमात्रांत समत्वानें असतात व त्यांनाच या श्रीभागवताच्या अर्थाचें रहस्य कळतें. ११ सद्गुरूची परम कृपा झाली असतां, शद्बार्थ समजून घेण्याचे कष्ट केल्यावांचूनच अनायासानें भागवताच्या अर्थांत श्रद्धाळु भक्ताचा प्रवेश होतो. १२ हृदयांत सद्भाव उत्पन्न होतांच तेथें देवाधिदेव प्रकट होतो व भागवताचा अभिप्रायहि सहज ठसतो. १३ म्हणून गुरुभक्ति केली असतां भागवताचा अर्थ कळतो. त्यासाठीं काव्यादि व्युत्पत्ति व अनेक युक्ति काय करावयाच्या

व्युत्पत्ती । नाना युक्ती किमर्थ ॥ १४ ॥ किमर्थ करावें शास्त्रज्ञान । किमर्थ धरावें वृथा ध्यान । चालतें बोलतें ब्रह्म पूर्ण । सद्गुरुचरण साधकां॥ १५ ॥ वांचूनियां गुरुभजन । शिष्यासी नोहे समाधान । याहूनियां श्रेष्ठ साधन । नाहीं जाण सर्वथा ॥ १६ ॥ त्या सद्गुरुकृपापरिपाटीं । एकादशीं पूर्वार्ध कोटी । वाखाणिली जी मऱ्हाटी । यथार्थदृष्टीं निजबोधें ॥ १७ ॥ ऊंस गाळितां रस होये । तो ठेविलिया बहुकाळ न राहे । त्याचा आळूनियां पाहें । गूळ होये सपिंड ॥ १८ ॥ तोहि ठेवितां लिगाड धरी । मग साखर कीजे रायपुरी । तेही घोटूनियां चतुरीं । नाबद करिजे कोरडी ॥ १९ ॥ तैसें हें श्रीभागवत जाण । मुळीं बोलिला श्रीनारायण । तेंचि श्रीव्यासें आपण । दशलक्षण वर्णिलें ॥ २० ॥ ते दशलक्षणपरवडी । श्रीशुकमुखें चढली गोडी । तेथील कठीण पदबंधमोडी । टीका चोखडी श्रीधरी ॥ २१ ॥ ते श्रीधरीचें व्याख्यान । भावार्थदीपिका जाण । त्या भावार्थाची सद्भाव खूण । केलें निरूपण देशभाषा ॥ २२ ॥ मुळीं वक्ता एक नारायण । व्यास–शुक–श्रीधरव्याख्यान । त्यांत मुळींचें लक्षूनि गोडपण । एका जनार्दन कवि कर्ता ॥ २३ ॥ मुळीं बीज श्रीनारायण । ब्रह्मयाचे ठायीं प्रेरिलें जाण । तें नारदक्षेत्रीं संपूर्ण । पीक परिपूर्ण निडारलें ॥ २४ ॥ त्याचें व्यासें दशलक्षण । संपूर्ण केलें संवगण । शुकें परिक्षितीच्या खळां जाण । मळूनि निजकण काढिले ॥ २५ ॥ तेंचि शास्त्रार्थें जाण । श्रीधरें निजबुद्धीं पाखडून । काढिले निडाराचे कण । अतिसघन सुटंक ॥ २६ ॥ त्याचीं पक्वान्नें चोखडीं । मऱ्हाटिया पदमोडी । एका जनार्दनें केली परवडी । ते जाणती गोडी निजात्मभक्त ॥ २७ ॥ त्या श्रोत्यांचेनि अवधानें । जनार्दनकृपा सावधानें । पूर्वार्ध एका जनार्दनें । संपूर्ण करणें देशभाषा ॥ २८ ॥ ते प्रथमाध्यायीं अनुक्रम । वैराग्यउत्पत्तीचा संभ्रम । कुलक्षयासी पुरुषोत्तम । करी उपक्रम ब्रह्मशापें ॥ २९ ॥ दुसऱ्यापासूनि चतुर्थवरी । नारदें वसुदेवाच्या घरीं । निमिजायंतप्रश्नोत्तरीं । पंचा-

---

आहेत ! १४ साधकाला चालतें-बोलतें पूर्ण ब्रह्मच असे सद्गुरुचरण लाधल्यावर मग त्यानें व्यर्थ ध्यान कशाला धरावें व शास्त्राचें ज्ञान कशासाठीं मिळवावें ! १५ गुरुभजनावांचून शिष्याचें समाधान होत नाहीं. म्हणून याहून दुसरें श्रेष्ठ साधन सर्वथा नाहीं १६ त्या सद्गुरूंच्या कृपेनें मी अकराव्या स्कंधाचा पूर्वार्ध मराठींत यथामति आत्मबोधानें वर्णन करून सांगितला. १७ ऊंस पिळला कीं रस निघतो, पण तो तसाच ठेविला असतां फार वेळ टिकत नाहीं (आंबून जातो). पण तोच रस आळवला कीं गुळाच्या ढेपा होतात. १८ तोहि गूळ ठेविला म्हणजे त्याला चिकटपणा येऊन पाणी सुटतें; म्हणून त्याची रायपुरी साखर करितात आणि चतुर लोक तिला घोटून त्याची जशी कोरडी स्वच्छ खडीसाखर बनवितात, १९ तसें हें भागवत आहे. मूळारंभीं श्रीनारायणानें तें सांगितलें व श्रीव्यासानें त्याचें दशलक्षणांनीं वर्णन केलें. २० त्या दशलणक्षयुक्त कथेला श्रीशुकाचार्यांच्या मुखानें जास्तच गोडी चढली. त्यांतील कठिण पदांचें स्पष्टीकरण करून श्रीधरानें त्यावर उत्कृष्ट टीका केली. २१ तीच श्रीधरी 'भावार्थदीपिका' नांवानें प्रसिद्ध आहे. त्या भावार्थाचा अर्थ मीं भक्तिभावानें मराठींत सांगितला. २२ मूळचा वक्ता एक नारायण. त्याचें व्याख्यान व्यास, शुक, श्रीधर यांनीं केलें. त्यांत मूळची गोडी कायम असलेली पाहून एका-जनार्दन काव्यकर्ता झाला. २३ नारायणानें आरंभीं ब्रह्मदेवाच्या ठिकाणीं या बीजाची प्रेरणा केली. तें बीज नारदरूपी शेतांत उगवून पीक मोठ्या जोमांत आलें. २४ तीं संपूर्ण दशलक्षण भागवतरूपी कणसें श्रीव्यासानें गोळा केलीं; शुकाचार्यानें परीक्षिति राजाच्या खळ्यांत त्याची मळणी केली; २५ श्रीधरस्वामीनें आपल्या बुद्धिरूपी सुपानें पाखडून त्यांतील ठसठशीत भरीव दाणे शास्त्रार्थानें वेंचून काढिले २६ व एका-जनार्दनानें त्याचीं रुचकर व स्वादिष्ट पक्वानें रांधून मराठी भाषेंत त्याची रेलचेल केली. त्याची गोडी आत्मभक्तच कायते जाणतात. २७ श्रोत्यांच्या अवधानानें व जनार्दनस्वामीच्या पूर्ण कृपेनें एकनाथ-जनार्दनानें मराठीमध्यें हा पूर्वार्ध शेवटास नेला. २८ त्याचा अनुक्रम पुढीलप्रमाणें आहे. पहिल्या अध्यायांत श्रीकृष्णानें स्वकुलाचा नाश करण्याकरितां ब्राह्मणांच्या शापरूपानें वैराग्याच्या उत्पत्तीस आरंभ केला. २९ दुसऱ्यापासून चवथ्या अध्यायापर्यंत नार-

ध्यायीं खरी संपविली ॥ ३० ॥ षष्ठाध्यायीं श्रीकृष्णमूर्ती । पाहों आलिया सुरवरपंक्ती । तिहीं प्रार्थिला श्रीपती । निजधामाप्रती जावया ॥ ३१ ॥ ऐकोनि सुरवरांची विनंती । देखोनि अरिष्टभूत द्वारावती । उद्धवें प्रार्थिला श्रीपती । निजधामाप्रती मज नेईं ॥ ३२ ॥ त्याचे प्रश्नांचें प्रश्नोत्तर । त्यागयुक्त ज्ञानगंभीर । सप्तमाध्यायीं शार्ङ्गधर । थोडेनि फार बोलिला ॥ ३३ ॥ तेथ त्यागसंग्रहलक्षण । यदुअवधूतसंवादें जाण । चोविसां गुरूंचें प्रकरण । केलें संपूर्ण अष्टमीं नवमीं ॥ ३४ ॥ श्रद्धासंग्रह ज्ञानविश्वास । तेथ नाना मतांचा मत-निरास । दशमाध्यायीं हृषीकेश । ज्ञानविलास बोलिला ॥ ३५ ॥ अकरावे अध्यायीं जाण । बद्धमुक्तांचें वैलक्षण्य । सांगूनि साधूचें लक्षण । भक्तीचें संपूर्ण दाविलें रूप ॥ ३६ ॥ भागवतीं बारावा अध्यावो । अतिगुह्य बोलिला देवो । तेथील लावितां अभिप्रावो । पडे संदेहो सज्ञाना ॥ ३७ ॥ बारावे अध्यायाची किल्ली । युक्तिप्रयुक्तीं नातुडे बोली । जनार्दनकृपा माउली । तेणें मार्गी दाविली ग्रंथाची ॥ ३८ ॥ तें द्वादशाध्यायीं निरूपण । सत्संगाचा महिमा गहन । कर्माचा कर्ता कोण । त्यागी तें लक्षण कर्माचें ॥ ३९ ॥ तो द्वादशाध्यावो ऐकतां । ज्ञानसंलग्नता होय चित्ता । आडवी ठाके विषयावस्था । तेणें बाधकता साधकां ॥ ४० ॥ गुणवैषम्याचें लक्षण । तेणें विषयावस्था गहन । तेथ सत्वशुद्धीचें कारण । केलें निरूपण त्रयोदशीं ॥ ४१ ॥ तेचि प्रसंगें यथोचित । चित्तविषयांचें जें ग्रथित । उगवावया हंस-गीत । सुनिश्चित सांगीतलें ॥ ४२ ॥ हंसगीतीं जें निरूपिलें ज्ञान । समाधिपर्यंत समाधान । तेंचि साधावया साधन । चवदावा आपण बोलिला देवो ॥ ४३ ॥ साधनांमाजीं मुख्य भक्ती । सगुण तेचि निर्गुण मूर्ती । योगयुक्त ध्यानस्थिती । बोलिला श्रीपती चतुर्दशीं ॥ ४४ ॥ विविधा सिद्धींची धारणास्थिती । देवें सांगीतली उद्धवाप्रती । सिद्धी बाधिका माझे प्राप्ती । हें पंधराव्या

दानें वसुदेवाच्या घरीं जाऊन निमि-जायंत प्रश्नोत्तरांचें वर्णन केलें व नारद-वसुदेवाच्या संवादानें खरी पंचाध्यायी संपविली. ३० सहाव्या अध्यायांत श्रीकृष्णाचें दर्शन घेण्यासाठीं श्रेष्ठ देवांच्या झुंडी आल्या व त्यांनीं त्यास वैकुंठाला चलण्याची विनंति केली. ३१ ती देवेश्वरांची विनंति ऐकून व द्वारकानगरी दुश्चिन्हांनीं व्यापिलेली पाहून उद्धवानें 'मला आपल्याबरोबर निजधामाला घेऊन जा.' अशी श्रीहरीची प्रार्थना केली. ३२ सातव्या अध्यायांत उद्धवाच्या प्रश्नाचें त्यागयुक्त ज्ञानगंभीर उत्तर श्रीकृष्णानें थोडक्यांत दिलें आहे. ३३ आठव्या व नवव्या अध्यायांत यदु-अवधूतसंवादानें चोवीस गुरूंचें ज्ञानसंग्रहलक्षण सांगितलें. ३४ दहाव्या अध्या-यांत श्रीकृष्णानें श्रद्धा कशी धरावी, ज्ञानावर विश्वास कसा ठेवावा, हें सांगून त्यांतील अनेक मतांचें निरसन करण्यासाठीं ज्ञानाचा चमत्कार सांगितला. ३५ अकराव्या अध्यायांत बद्ध व मुक्त यांच्यांतील भेद दाखवून व साधूंचें लक्षण सांगून भक्तीचें पूर्ण स्वरूप दाखविलें. ३६ बाराव्या अध्यायांत देवानें अति गुप्त गोष्ट सांगितली. त्याचा अर्थ लावतांना मोठे विद्वान्हि संशयांत पडतात. ३७ बाराव्या अध्यायाची गुरुकिल्ली-केवळ युक्ति-प्रयुक्तीनें सांपडत नाहीं. कृपाळु जनार्दन-माउलीनें मार्ग दाखविला, तेव्हांच तो ग्रंथ उलगडला. ३८ त्या बाराव्या अध्यायांत सत्संगतीचा अगाध महिमा; कर्माचा वास्तविक कर्ता कोण व त्याग हेंच कर्माचें लक्षण यांचें निरूपण केलें आहे. ३९ असा तो बारावा अध्याय ऐकिला कीं, चित्ताला ज्ञानाची जोड मिळते; पण विषयावस्था आडवी येऊन साधकाला बाधक होते. ४० म्हणून तेराव्या अध्यायांत गुणवैषम्याचें लक्षण त्यामुळें होणारी विषयावस्थेची गहनता, सत्त्व-शुद्धीचें साधन यांचें निरूपण केलें आहे. ४१ याच प्रसंगानें विषय व मन यांचा जो परस्परांकडे ओढा असतो, त्याचें कारण उलगडून सांगण्यासाठीं हंसगीत सांगितलें, ४२ हंसगीतांत जें समाधीपर्यंत समाधान देणारें ज्ञान सांगितलें, त्याचें साधन श्रीकृष्णानें आपण होऊन चवदाव्या अध्यायांत सांगितलें. ४३ सर्व साधनांमध्यें भक्ति मुख्य आहे. जी सगुणमूर्ति तेंच माझें निर्गुणस्वरूप आहे, असें सांगून योगयुक्त ध्यानस्थितीहि श्रीकृष्णानें चवदाव्या अध्यायांत वर्णन केली आहे. ४४ पंधराव्या अध्यायांत श्रीकृष्णानें नाना प्रकारच्या सिद्धींचे प्रकार उद्धवाला सांगून या सिद्धि

अंतीं निरूपिलें ॥ ४५ ॥ एवं पंधराध्यायीं पूर्वार्ध । निरूपण झालें अतिशुद्ध । आतां उचललें उत्तरार्ध । तो कथासंबंध अवधारा ॥ ४६ ॥ षोडशीं भगवद्विभूती । सतरा अठरा अध्यायांप्रती । वर्णाश्रमकर्मगती । विधानस्थिती निरूपण ॥ ४७ ॥ एकुणिसावा अध्याय गहन । ज्ञाननिर्णयाचें महिमान । उद्धवाचे यम-नियमादि प्रश्न । सांगीतलें ज्ञानपरिपाकें ॥ ४८ ॥ त्या ज्ञानाधिकाराचा योग । अज्ञानज्ञान मध्यस्थभाग । विसावे अध्यायीं श्रीरंग । त्रिविध विभाग बोलिला ॥ ४९ ॥ तेथ गुणदोषांची अवस्था । उद्धवें ठेविली वेदांचे माथां । ते वेदवादसंस्था । केली तत्त्वतां एकविसांत ॥ ५० ॥ तेचि वेदवादव्युत्पत्ती । तत्वांची संख्या किती । ते तत्त्वसंख्याउपपत्ती । केली श्रीपतीं यथान्वयें ॥ ५१ ॥ सफळ तत्त्वांचें विवेचन । प्रकृतिपुरुषांचें लक्षण । जन्ममरणांचें प्रकरण । केलें निरूपण बाविसावां ॥ ५२ ॥ साहोनियां परापराध । स्वयें राहावें निर्द्वंद्व । हा भिक्षुगीतसंवाद । केला विशद तेविसावां ॥ ५३ ॥ अद्वैतीं राहावया स्थिती । चोविसावां सांख्यव्युत्पत्ती । निर्गुणापासोनि गुणोत्पत्ती । गुणक्षयाअंतीं निर्गुण उरे ॥ ५४ ॥ आदीं निर्गुण अंतीं निर्गुण । मध्यें भासले मिथ्या गुण । ये अद्वैतप्राप्तीलागीं जाण । केलें निरूपण सांख्याचें ॥ ५५ ॥ ते मिथ्यागुण प्रवृत्तियुक्त । त्रिगुणगुणांचा सन्निपात । बोलिला पंचविसाव्यांत । निर्गुणोक्त निजनिष्ठा ॥ ५६ ॥ सव्विसावे अध्यायाप्रती । अनिवार अनुतापाची शक्ती । भोगितां उर्वशी कामप्राप्ती । पावला विरक्ती पुरूरवा ॥ ५७ ॥ भजनक्रिया मूर्तिलक्षण । वैदिक तांत्रिक मिश्र भजन । या उद्धवप्रश्नाचें निरूपण । केलें संपूर्ण सत्ताविसावां ॥ ५८ ॥ महायोग्याचें योगभांडार । परम ज्ञानें ज्ञानगंभीर । निजसुखाचें सुखसार । केवळ चिन्मात्र अठ्ठाविसावां ॥ ५९ ॥ त्याचि अध्याया-माजीं जाण । संसारअसंभवाचा प्रश्न । उद्धवें केला अतिगहन । त्याचेंही प्रतिवचन दीधलें देवें ॥ ६० ॥

माझ्या प्राप्तीला बाधक आहेत, असें शेवटीं सांगितलें आहे. ४५ अशा प्रकारें पंधराव्या अध्यायांत पूर्वार्धाचें अति-शुद्ध निरूपण केलें व उत्तरार्ध हातीं घेतला. त्याचा अध्यायक्रम आतां ऐका. ४६ सोळाव्या अध्यायांत भगवानाच्या विभूतींचें वर्णन आहे. सतरा व अठरा या दोन अध्यायांत वर्णाश्रमकर्मांची गति व त्या विधानाचे प्रकार, यांचें निरूपण आहे. ४७ एकुणिसावा अध्याय अतिशय गहन आहे. त्यांत ज्ञाननिर्णयाचें माहात्म्य वर्णन करून उद्धवाच्या यमनियमादि प्रश्नांचें ज्ञानयुक्त उत्तर आहे. ४८ विसाव्या अध्यायांत अज्ञान, ज्ञान व मध्यावस्था या तीन प्रकारानें ज्ञानाधिकाराचा योग भगवानानें सांगितला आहे. ४९ एकविसाव्या अध्यायांत गुण-दोषांची अवस्था उद्धवानें वेदांच्या मस्तकावर ठेविल्यामुळें भगवानानें वेदवादांचें खरें रहस्य सांगून त्याचें उत्तर दिलें आहे. ५० त्या वेदवादांच्या प्रसंगीं एकंदर तत्त्वांची संख्या किती, या प्रश्नांचेंहि उत्तर श्रीकृष्णानें यथाशास्त्र दिलें आहे. ५१ बाविसाव्या अध्यायांत सगळ्या तत्त्वांचें विवेचन करून, प्रकृति-पुरुषांचें लक्षण व जन्म-मरण यांचें निरूपण केलें आहे. ५२ तेविसाव्या अध्यायांत दुसऱ्यानें केलेला अपराध सहन करून आपण द्वंद्वरहित होऊन रहावें, हें भिक्षुगीतसंवादानें स्पष्ट करून दाखविलें आहे. ५३ चोविसाव्या अध्यायांत अद्वैतांत स्थिर होण्यासाठीं आत्मानात्मविवेक व निर्गुणापासून गुणांची उत्पत्ति सांगितली. गुणांचा क्षय झाल्यावर निर्गुणच शिल्लक रहातें. ५४ आरंभीं निर्गुण व शेवटीं निर्गुण, तेव्हां मध्यें भासणारे गुण मिथ्याच होत. या अद्वैत प्राप्तीसाठीं आत्मा व अनात्मा यांचें निरूपण केलें आहे. ५५ पंचविसाव्या अध्यायांत ते मिथ्या गुण प्रवृत्तियुक्त आहेत. व तीन गुणांचा परस्पर संबंध आहे, हें सांगून निर्गुणात आत्मनिष्ठा कशी ठेवावी, हें सांगितलें आहे. सव्विसाव्या अध्यायांत पश्चात्तापाच्या अचाट शक्तीचें वर्णन करून पुरूरवा उर्वशीबरोबर यथेच्छ विलास भोगीत असतां अखेर विरक्त झाला, ही कथा सांगितली आहे. ५७ सत्ताविसाव्या अध्यायांत भजनाचा प्रकार, मूर्तीचें लक्षण, वैदिक, तांत्रिक व मिश्रभजन या उद्धवाच्या प्रश्नांचीं सविस्तर उत्तरें आहेत. ५८ अठ्ठाविसावा अध्याय श्रेष्ठ योग्यांचें योगभांडार, आत्मसुखाचें केवळ सारच व परम ज्ञानानें ज्ञानगंभीर असा केवळ चिन्मात्र आहे. ५९ 'संसार असंभवनीय आहे' या उद्धवाच्या गहन प्रश्नांचें उत्तरहि श्रीकृष्णानें याच अध्यायांत दिलें आहे. ६० एकुणतिसावा अध्याय तर

एकादशाचा निजकळसू । भक्तिप्रेमाचे अतिविलासू । एकुणतिसावा सुरसरसू । ज्ञानोपदेशू भक्तियुक्त ॥ ६१ ॥ पुढिले दों अध्यायांआंत । स्त्रीपुत्रादि कुळाचा घात । होतां डंडळीना ज्ञानसमर्थ । तें प्रत्यक्षभूत हरि दावी ॥ ६२ ॥ ब्राह्मणांचा शाप कठिण । शापें बाधिला श्रीकृष्ण । इतरांची कथा कोण । कुळानिर्दळण ब्रह्मशापें ॥ ६३ ॥ ब्राह्मणांचा कोप समर्थ । सगळा समुद्र केला मूत । शिवाचा जाला लिंगपात । ब्रह्मक्षोभांत निमेषार्धें ॥ ६४ ॥ यालागीं सज्ञान अथवा मुग्ध । तिहीं न करावा ब्रह्मविरोध । हेंचि दावावया मुकुंद । कुलक्षयो प्रसिद्ध दाखवी ॥ ६५ ॥ निजदेहासी जो करी घात । तो जराव्याध केला मुक्त । येथवरी ज्ञाता देहातीत । क्षमायुक्त तो सज्ञान ॥ ६६ ॥ एकुणतीस अध्यायपर्यंत । कृष्णें उपदेशिला ज्ञानार्थ । पुढील दोन अध्यायांत । स्वयें दावीत विदेहत्व ॥ ६७ ॥ राम अयोध्या घेऊन गेला । कृष्णें निजदेहही सांडिला । येणें देहाभिमान मिथ्या केला । तरावया पुढिलां मुमुक्षां ॥ ६८ ॥ पंधरा अध्याय पूर्वार्ध । व्याख्यान झालें अतिशुद्ध । सूत्रप्राय उत्तरार्ध । दाविले विशद अध्यायार्थ ॥ ६९ ॥ साह्य सद्गुरु जनार्दन । श्रोतीं द्यावें अवधान । पुढील उत्तरार्धव्याख्यान । एका जनार्दन बोलवी ॥ ७० ॥ झालिया वसंताचें रिगवणें । वृक्ष सपुष्प सफळ तेणें । तेवीं जनार्दनकृपागुणें । सार्थक वचनें कवित्वाचीं ॥ ७१ ॥ गगनीं उगवला अंशुमाळी । जेवीं विकासिजे नवकमळीं । तेवीं जनार्दनकृपामेळीं । कवित्वनवाळी विकासे ॥ ७२ ॥ वेणु घेऊनियां हातें । विश्वा मोहिलें कृष्णनाथें । तेवीं कवीश्वर करोनि मातें । वक्ता येथें जनार्दन ॥ ७३ ॥ तो जनार्दनकृपाक्षीराब्धी । ज्याचे कृपेसी नाहीं अवधी । तेणें उत्तरार्धीं प्रवेशे बुद्धी । अर्थसिद्धीसमवेत ॥ ७४ ॥ मागील कथासंगती । पंधरावे

अकराव्या स्कंधाचा कळसच, भक्तिप्रेमाचा विलास, अशा सुरस भक्तियुक्त ज्ञानोपदेशानें भरलेला असल्यामुळें तो अत्यंत सरस आहे. ६१ पुढील तीस व एकतीस या दोन अध्यायांत आपल्या स्त्री-पुत्रादि सगळ्या कुलाचा नाश झाला असतांहि ज्ञानसमर्थ मनुष्याचें चित्त डळमळत नाहीं, हें श्रीकृष्णानें प्रत्यक्ष स्वतःच्या आचरणानें दाखवून दिलें आहे. ६२ ब्राह्मणांचा शाप मोठा कठिण ! तो श्रीकृष्णालाहि बाधला; मग इतरांची काय कथा ! केवल ब्राह्मणांच्या शापामुळें कुलाचा समूल नाश झाला. ६३ ब्राह्मणांचा कोप अति समर्थ आहे. त्यानें सर्व समुद्राला अपवित्र व अपेय जलरूप केलें. ब्राह्मणाच्या कोपानें शिवाचा निमिषार्धांत लिंगपात झाला; ६४ म्हणून ज्ञात्यानें किंवा अज्ञानें केव्हांहि ब्राह्मणांशीं वैर करूं नये, हेंच दाखविण्यासाठीं श्रीकृष्णानें आपल्या कुलाचा प्रत्यक्ष क्षय करून दाखविला. ६५ ज्या जराव्याधानें श्रीकृष्णाच्या शरीराला बाणानें वेध केला त्यालाहि त्यानें मुक्त केलें. जो ज्ञाता इतका देहातीत व क्षमाशील असतो, तोच सज्ञान होय. ६६ एकुणतीस अध्यायापर्यंत श्रीकृष्णानें ज्ञानार्थाचा उपदेश केला व पुढल्या दोन अध्यायांत स्वतःचा देहातीतपणा दाखविला. ६७ श्रीरामचंद्रानें आपल्याबरोबर सगळी अयोध्यानगरी निजधामाला नेली. श्रीकृष्णानें आपल्या देहाचाहि त्याग केला. पुढील मुमुक्षूंना तरून जाण्यासाठीं त्यानें देहाभिमान मिथ्या करून दाखविला. ६८ पंधरा अध्यायांपर्यंत पूर्वार्धाचें अतिशुद्ध व्याख्यान केलें व उत्तरार्धाच्या अध्यायांचें थोडक्यांत स्पष्टीकारण केलें. ६९ माझा साह्यकर्ता सद्गुरु जनार्दन आहे, तरी श्रोत्यांनीं सावध व्हावें. पुढील उत्तरार्धाचें व्याख्यान जनार्दन माझ्याकडून बोलवीत आहे. ७० वसंत ऋतूला आरंभ झाला कीं, वृक्ष फुलाफलांनीं जसे प्रफुल्ल होतात, किंवा आकाशांत सूर्य उगवतांच नवीन कमलें विकसित होतात, त्याप्रमाणें जनार्दनस्वामींच्या कृपेमुळें कवित्वाची नवीन स्फूर्ति विकसित झाली व कवितावचनाचें सार्थक झालें. ७१-७२ श्रीकृष्णानें हातांत मुरली घेऊन तिच्या नादानें जसें सगळ्या विश्वाला मोहून टाकिलें, त्याप्रमाणें मला श्रेष्ठ कवि बनवून श्रीजनार्दनच बोलत आहेत. ७३ जनार्दन कृपारूपी क्षीराचा सागर आहे. ७४ त्याच्या कृपेला सीमा नाहीं. म्हणूनच उत्तरार्धांत माझी बुद्धि अर्थसिद्धीसह प्रवेश करीत आहे. मागील कथासंगति अशी आहे. 'माझ्या प्राप्तीला सिद्धि बाधक आहेत' असें श्रीकृष्णानें पंधराव्या अध्यायाच्या

अध्यायाअंतीं । सिद्धी बाधिका माझे प्राप्ती । ऐसें श्रीपती बोलिला ।। ७५ ।। एवं सांडूनि सिद्धींचें ध्यान । माझे स्वरूपीं राखावें मन । हें ऐकोनि कृष्णवचन । उद्धवें प्रश्न मांडिला ।। ७६ ।। उद्धव म्हणे श्रीकृष्णनाथा । विनंती अवधारीं समर्था । तुझ्या विभूति समस्ता । मज तत्त्वतां सांगाव्या ।। ७७ ।।

उ० उ०—त्वं ब्रह्म परमं साक्षादनाद्यन्तमपावृतम् । सर्वेषामपि भावानां त्राणस्थित्यप्ययोद्भवः ।। १ ।।

भूतभौतिकांचें तूं कारण । तुझेनि जन्म-स्थिती-निधन । इतुकें करोनि अकर्ता जाण । ब्रह्म परिपूर्ण तूं यालागीं ।। ७८ ।। म्हणसी उत्पत्ति स्थिती मरण । भूतांतें प्रकृति करी जाण । ते प्रकृति तुझें अधीन । तुझेनि चलन प्रकृतीसी ।। ७९ ।। यालागीं प्रकृति ते परतंत्र । तूं परमात्मा स्वतंत्र । अनादि अव्ययो अपार । श्रुतीसी पार न कळेचि ।। ८० ।। प्रकृतीसी तुझें आवरण । तूं अनंत गा निरावरण । जीवांचें स्वरूप गा तूं आपण । परी जीवपण तुज नाहीं ।। ८१ ।। जीवू तितुका अज्ञानयुक्त । तूं ज्ञानाज्ञानातीत निश्चित । यालागीं ब्रह्म तूं साक्षात् । अविनाशवंत अपरोक्ष ।। ८२ ।। तो तूं अपरोक्ष कैसा म्हणशी । सर्वीं सर्वत्र सबाह्य असशी । ऐसा असोनि अतर्क्य होशी । हृषीकेशी तें ऐक ।। ८३ ।।

शेवटीं सांगितलें. ७५ अशा प्रकारें सिद्धीचा लोभ सोडून माझ्या स्वरूपांत मन लावावें, हें श्रीकृष्णाचें वचन ऐकून उद्धवानें हा प्रश्न पुढें ठेविला. ७६ तो म्हणाला, हे श्रीकृष्णनाथा ! समर्था ! माझी एवढी विनंति ऐक. तुझ्या सगळ्या विभूति मला एकदां तत्त्वतः सांग. ७७.

[या सोळाव्या अध्यायामध्यें हरीच्या आविर्भावयुक्त विभूति ज्ञान-वीर्य-प्रभावादि विशेषांसह वर्णिलेल्या आहेत. ज्यांच्या चित्ताला संस्कार झालेले नाहींत, त्यांना मनानें ईश्वराचें ध्यान करणें अशक्य आहे, म्हणून चित्ताला ध्यानाची योग्यता प्राप्त होण्यासाठीं येथें विभूत्यादिकांचें निरूपण केलें आहे. येथें श्रीधरस्वामींनीं या स्कंधाच्या प्रत्येक अध्यायाचें विषयवर्णन केलें आहे. परंतु एकनाथांनींहि वर मंगलाचरणांत त्याचाच अनुवाद केला आहे व त्याचा शब्दशः अर्थ भावार्थांत दिला आहे. म्हणून येथें आम्हीं श्रीधरी टीकेचा अनुवाद केला नाहीं.]

—पंधराव्या अध्यायाच्या शेवटल्या श्लोकाच्या उत्तरार्धांत 'आकाशादि महाभूतें, जरायुजादि चार प्रकारच्या प्राणि-शरीरांत जशीं अंतर्बहिः व्यापून असतात, त्याप्रमाणें मीहि त्यांना अंतर्बाह्य व्यापून रहातों' असें सांगितलें आहे. पण त्यांतील कांहीं भूतांमध्यें कांहीं ठिकाणीं एखाद्याच गुणाचा अतिरेक झालेला दिसतो. कांहीं ठिकाणीं ती सामान्यरूपानेंच रहातात. तसाच तूंहि कोठें कसा रहातोस ! अशा आशयानें भगवानाच्या विभूतींविषयीं प्रश्न करण्यासाठीं उद्धव अगोदर भगवानाच्या पूर्वोक्त सर्वा-त्मकत्वाचाच अनुवाद करितो—

उद्धवः उवाच—उद्धव म्हणाला—त्वं साक्षात् परमं ब्रह्म—तूं साक्षात् परब्रह्म आहेस, अनाद्यन्तं अपावृतं—तें ब्रह्म आदि-अंतशून्य, आवरणरहित किंवा स्वतंत्र, म्हणूनच, सर्वेषां अपि भावानां त्राणस्थित्यप्ययोद्भवः—सर्व प्राण्यांचें रक्षण, जीवन, लय व उत्पत्ति हीं तुझ्यापासूनच होतात. [सर्वांचेंहि रक्षण व जीवन यांसह प्रलय व उद्भव यांचें तूं सत्त्वाख्य उपादान कारण आहेस.] १.

भूत-भौतिकांचें तूंच कारण आहेस. तुझ्याचमुळें उत्पत्ति, स्थिति व लय होतात. इतकें करूनहि तूं अकर्ता आहेस. यास्तव तूं परिपूर्ण ब्रह्म आहेस. ७८ तूं कदाचित् असें म्हणशील कीं, उत्पत्ति-स्थिति-लय व भूत-भौतिक मायेमुळें होत असतात, तर ती प्रकृतीहि तुझ्याच अधीन आहे. तुझ्यामुळेंच प्रकृतीला चालन मिळतें. ७९ यास्तव ती माया परतंत्र आहे व तूं परमात्मा स्वतंत्र आहेस. तूं अनादि, अव्यय, अपार आहेस. श्रुतीलाहि तुझा थांग लागत नाहीं. ८० मायेला तुझें आवरण आहे; पण तूं अनंत आवरणरहित आहेस. तूं स्वतः जीवाचें स्वरूप आहेस; पण तुला जीवपणा नाहीं. ८१ जेवढा जीव तेवढा अज्ञानयुक्त आहे; पण तूं ज्ञान व अज्ञान यांच्या पलीकडे आहेस; म्हणून तूं साक्षात् ब्रह्म आहेस. तूं अविनाशी व अपरोक्ष आहेस. ८२ अपरोक्ष कसा म्हणून विचारशील, तर तूं सर्वांत सर्व ठिकाणीं सबाह्य भरलेला असूनहि अतर्क्य आहेस. हे श्रीकृष्णा ! 'तें कसें' म्हणून विचारशील, तर ऐक. ८३.

उच्चावचेषु भूतेषु दुर्ज्ञेयमकृतात्मभिः । उपासते त्वां भगवन्याथातथ्येन ब्राह्मणाः ॥ २ ॥

मशकादि हिरण्यगर्भपर्यंत । तूं सबाह्य सर्व भूतीं संतत । ऐशिया तूतें निश्चित । ब्राह्मण जाणत वेदार्थें ॥ ८४ ॥ आकळूनि उपनिषदर्थ । तुझ्या ठायीं भजनयुक्त । ते तुज सर्वगतातें जाणत । सुनिश्चित सर्वात्मा ॥ ८५ ॥ त्या सर्वात्म्याचा पाहतां पार । अचिंत्यानंतऐश्वर्यधर । त्या तुज नेणति प्राकृत नर । ऐक विचार तयांचा ॥ ८६ ॥ जे मनाचे विकिले । उपस्थाचे अंकिले । जे रसनेचे पोसणे झाले । निद्रेनें केले घरजांवयी ॥ ८७ ॥ त्यांसी स्वतःसिद्ध स्वरूप पाहीं । सर्वगत न पडेचि ठायीं । निजात्मता न कळे देहीं । सदा विषयीं भूलले ॥ ८८ ॥ विषयीं चंचळ अंतःकरण । त्यांसी नव्हे ध्यान सगुण । निर्गुणीं प्रवेशेना मन । अज्ञान जन केवीं तरती ॥ ८९ ॥ न करितां नाना व्युत्पत्ती । न धरितां ध्यानस्थिती । तुझ्या उत्तमा ज्या विभूती । त्या सांग निश्चितीं भजनासी ॥ ९० ॥

येषु येषु च भावेषु भक्त्या त्वां परमर्षयः । उपासीनाः प्रपद्यन्ते संसिद्धिं तद्वदस्व मे ॥ ३ ॥

ज्या ज्या तुझ्या विभूती । पूर्वीं उपासिल्या संतीं । दृढभावें करोनियां भक्ती । तुझी स्वरूपप्राप्ती पावले ॥ ९१ ॥ त्या सकळ तुझ्या विभूती । कवण स्थिती कवण व्यक्ती । कवण भाव कवण गती । हें निश्चितीं मज सांगा ॥ ९२ ॥ म्हणसी सकळ भूतांप्रती । तूंचि वोळख माझ्या विभूती । तरी ते तुझी अतर्क्य स्थिती । न कळे श्रीपती आमुचेनी ॥ ९३ ॥

—याविषयीं उद्धव सदाचाररूप प्रमाण सांगतो—

भगवन् अकृतात्मभिः उच्चावचेषु भूतेषु दुर्ज्ञेयं त्वां ब्राह्मणाः याथातथ्येन उपासते—हे भगवन् शास्त्रसंस्कार-शून्य लोकांना उच्च-नीच भूतांमध्यें दुर्ज्ञेय असलेल्या म्ह० सर्व भूतांचें कारण अशा तुला वेदतात्पर्यज्ञ ब्राह्मण सत्यस्वरूपानें उपासितात. २.

क्षुद्र कीटकापासून ब्रह्मदेवापर्यंत सर्व प्राण्यांत तूं सबाह्य परिपूर्ण भरलेला आहेस. अशा तुला ब्राह्मण वेदार्थावरून जाणतात. ८४ उपनिषदांचा अर्थ जाणून तुझें भजन करणारे भक्त तुज सर्वांतर्यामीला खात्रीनें सर्वात्मा असें समजतात. ८५ अचिंत्य व अपार असें ज्याचें ऐश्वर्य आहे, अशा तुज सर्वात्म्याला जे अज्ञ लोक जाणत नाहींत, त्यांची स्थिति काय होते, ती ऐक. ८६ ते मनाला विकून घेतात, कामेच्छेचे दास होतात, रसनेचे आश्रित होतात व निद्रा त्यांना घरजांवई करून ठेविते. ८७ त्यांना स्वयंसिद्ध व सर्वगत आत्मस्वरूपाचा उमज पडत नाहीं. आपल्या देहांतील आत्म्याला ते जाणत नाहींत. ते सर्वदा विषयांना भुललेले असतात. ८८ त्यांचें अंतःकरण विषयांसाठीं चंचल झालेलें असतें, त्यांना सगुण ध्यान साधत नाहीं व निर्गुण ध्यानांत त्यांचें मन प्रवेश करीत नाहीं. मग अज्ञ जन कसे तरणार ! ८९ तेव्हां अनेक साधनें केल्यावांचून व ध्यान-धारणा धरिल्यावांचून तुझें भजन करितां यावें, म्हणून तुझ्या ज्या उत्तम विभूति आहेत, त्या मला निश्चित सांग. ९०.

—याप्रमाणें कारणत्वानें भगवानाच्या सर्वात्मत्वाचा अनुवाद करून उद्धव विभूति विचारितो—

परमर्षयः येषु येषु च भावेषु भक्त्या त्वां उपासीनाः सन्तः संसिद्धिं प्रपद्यन्ते तत् मे वदस्व—श्रेष्ठ ऋषि ज्या ज्या पदार्थांमध्यें भक्तीनें तुझी उपासना करीत होत्साते संसिद्धीला प्राप्त होतात, ते ते पदार्थ मला सांग. ३.

पूर्वींच्या संतांनीं तुझ्या ज्या ज्या विभूतींची उपासना केली व दृढ भक्तीनें तुझ्या स्वरूपाची प्राप्ति करून घेतली, ९१ त्या तुझ्या सगळ्या विभूति, त्यांची स्थिति, त्यांचें स्वरूप, त्यांची भक्ति व त्यापासून प्राप्त होणारी गति हें सर्व मला निश्चित सांग. ९२ तूं कदाचित् यावर असें म्हणशील कीं, सगळ्या भूतांमध्यें असणारें माझें स्वरूप तूंच ओळख; तर हे श्रीपति ! तुझी ही अगम्य स्थिति आम्हांला कळत नाहीं. ९३.

गूढश्चरसि भूतात्मा भूतानां भूतभावनः । न त्वां पश्यन्ति भूतानि पश्यन्तं मोहितानि ते ॥ ४ ॥

सर्व भूतांचा हृदयस्थ । हृदयीं असोनि गुप्त । त्या तूंतें भूतें समस्त । न देखत देहभ्रमें ॥ ९४ ॥ त्या देहभ्रमासी देवराया । मूळकारण तुझी माया । तेथें तुझी कृपा झालिया । माया जाय विलया गुणेंसीं ॥ ९५ ॥ मग सर्वत्र सर्वां ठायीं । सर्व भूतीं सबाह्य देहीं । तुझें स्वरूप ठायीं ठायीं । प्रकटे पाहीं सदोदित ॥ ९६ ॥ एवढें तुझें कृपेचें करणें । ते कृपा लाहिजे कवणें गुणें । यालागीं तुझ्या विभूति उपासणें । तुझे कृपेकारणें गोविंदा ॥ ९७ ॥ याचिलागीं विभूतींची स्थिती । समूळ सांगावी मजप्रती । तेचि अर्थीची विनंती । पुढतपुढतीं करीतसें ॥ ९८ ॥

याः काश्च भूमौ दिवि वै रसायां विभूतयो दिक्षु महाविभूते ।
ता मह्यमाख्याह्यनुभावितास्ते नमामि ते तीर्थपदाङ्घ्रिपद्मम् ॥ ५ ॥

स्वर्गमृत्युपाताळस्थिती । विस्तारल्या दशदिशांप्रती । त्या समस्तही तुझ्या विभूती । सांग श्रीपती मजलागीं ॥ ९९ ॥ ऐसा करोनियां प्रश्न । उद्धवें घातलें लोटांगण । सकळ तीर्थांचें जन्मस्थान । मस्तकीं श्रीचरण वंदिले ॥ १०० ॥ ऐकोनि उद्धवाच्या प्रश्नासी । परम संतोषे हृषीकेशी । पुरस्करोनि उद्धवासी । काय त्यासी बोलिला ॥ १ ॥ जो वैरिगजयूथपंचानन । कोदंडदीक्षाप्रतापगहन । सखा जिवलग पढियंता जाण । जीवप्राण जो माझा ॥ २ ॥ ज्याचे रथींचे मी धुरेवरी । ज्याच्या अश्वांचे वाग्दोरे धरीं । जो उपदेशिला कुरुक्षेत्रीं । उभय सेनेमाझारीं रणरंगीं ॥ ३ ॥ तो नरावतार अर्जुन । त्याच्याऐसा हा तुझा प्रश्न । ऐसें उद्धवासी संतोषोन । काय श्रीकृष्ण बोलिला ॥ ४ ॥

—उद्धव भगवानाचें दुर्ज्ञेयत्वच प्रकट करितो—

भूतभावनः–हे भूतांच्या उत्पादका, **भूतात्मा त्वं भूतानां गूढः चरसि**–तूं सर्वभूतांचा आत्मा म्ह० अंतर्यामी असल्यामुळें सर्व प्राण्यांमध्यें गूढ आहेस. **ते मोहितानि भूतानि पश्यंतं त्वां न पश्यन्ति**–तुझ्याकडून मोहित केलीं गेलेलीं भूतें सर्वांचा द्रष्टा अशाहि तुला पहात नाहींत. ४.

सर्व प्राण्यांच्या हृदयांत असलेला पण हृदयांत असूनहि गुप्त असलेल्या तुला हीं सर्व भूतें देहभ्रमामुळें पहात नाहींत. ९४ हे देवराया ! या देहभ्रमाचें मूळ कारण तुझी माया आहे; परंतु तुझी कृपा झाली असतां ती माया गुणासह लय पावते. ९५ मग सर्वत्र, सर्व ठिकाणीं, सर्व भूतांमध्यें, अंतर्बाह्य तुझें स्वरूप ठिकठिकाणीं सदोदित प्रकट होतें. ९६ हे गोविंदा ! एवढी तुझी कृपा कोणत्या गुणानें प्राप्त होते ! तुझी कृपा संपादन करण्यासाठीं तुझ्या विभूतींची आराधना करावयास पाहिजे. ९७ म्हणून तुझ्या विभूतींचें स्वरूप पूर्णपणें मला सांग. याच अर्थाची विनंति उद्धव पुनः पुनः करीत आहे. ९८.

महाविभूते–हे महाविभूतिमान् ईश्वरा ! **भूमौ दिवि रसायां वै दिक्षु याः काः च विभूतयः ताः ते अनुभविताः मह्यं आख्याहि**–पृथ्वीमध्यें, स्वर्गामध्यें, पाताळांत व सर्व दिशांमध्यें ज्या कांहीं तुझ्या विभूति आहेत त्या तूंच एका विशिष्ट शक्तीनें संयुक्त केलेल्या विभूति मला सांग. ते **तीर्थपदाङ्घ्रिपद्मं नमामि**–मी तुझ्या तीर्थभूत चरणकमलाला नमस्कार करितों. ५.

हे श्रीकृष्णा ! स्वर्ग, मृत्यु व पाताळ यांत व दाही दिशांत विस्तारलेल्या जेवढ्या तुझ्या विभूति आहेत, तेवढ्या सगळ्या मला सांग. ९९ असा प्रश्न करून उद्धवानें लोटांगण घातलें व सगळ्या तीर्थांचें जन्मस्थान असे जे प्रभुचरण त्यांवर मस्तक ठेवून त्यांस वंदन केलें. १०० हा उद्धवाचा प्रश्न ऐकून श्रीकृष्णाला परम संतोष झाला. तो उद्धवाला उद्देशून काय बोलला, तें ऐका. १ जो शत्रुरूपी हत्तींच्या समूहाचा नाश करणारा सिंहच, गांडीव धनुष्य धारण करणारा, जिवलग सोबती, माझा आवडता जीव कीं प्राण, २ ज्याचा सारथी होऊन त्याच्या घोड्यांचे लगाम मीं हातीं धरिले, ज्याला कुरुक्षेत्रांत युद्धभूमीवर दोन्ही सैन्यांमध्यें मीं उपदेश केला. ३ जो नराचा अवतार अशा अर्जुनाच्या प्रश्नासारखाच तुझा हा प्रश्न आहे असें मोठ्या संतोषानें बोलून श्रीकृष्णानें उद्धवाला काय सांगितलें, तें ऐका. १०४.

श्रीभगवानुवाच–एवमेतदहं पृष्टः प्रश्नं प्रश्नविदांवर । युयुत्सुना विनशने सपत्नैरर्जुनेन वै ॥ ६ ॥

हाचि प्रश्न मजकारणें । पूर्वी पुशिला अर्जुनें । जेव्हां तिरस्कारूनि दुर्योधनें । युद्ध सत्राणें मांडिलें ॥ ५ ॥ अरिनिर्दळणीं प्रतापपूर्ण । धीर वीर आणि सज्ञान । प्रश्नकर्त्यांमाजीं विचक्षण । माझा आत्मा जाण अर्जुन ॥ ६ ॥ तेणें अर्जुनें कुरुक्षेत्रीं । युद्धसमयीं महामारीं । स्वजनवधाचें भय भारी । हाचि प्रश्न करी मज तेव्हां ॥ ७ ॥

ज्ञात्वा ज्ञातिवधं गर्ह्यमधर्मं राज्यहेतुकम् । ततो निवृत्तो हन्ताहं हतोऽयमिति लौकिकः ॥ ७ ॥
स तदा पुरुषव्याघ्रो युक्त्या मे प्रतिबोधितः । अभ्यभाषत मामेवं यथा त्वं रणमूर्धनि ॥ ८ ॥

केवळ राज्यलोभाकारणें । गुरु गोत्र पितृव्य वधणें । हें अतिनिंद्य मजकारणें । नाहीं झुंझणें प्राणांतीं ॥ ८ ॥ लौकिक धर्मप्रवृत्ती । मी मारिता हे मरती । हे महामोहाची भ्रांती । उपजली चित्तीं अर्जुना ॥ ९ ॥ राज्यभोगाचें धरोनि वर्म । ज्ञातिवधाचें निंद्य कर्म । हा केवळ मज अधर्म । धर्माचा स्वधर्म बुडेल ॥ ११० ॥ ज्यांचें तीर्थ घ्यावें प्रतिदिनीं । जे पूजावे वरासनीं । ते खोंचूनि तिखट बाणीं । भोगावी अवनी स्वगोत्ररुधिरें ॥ ११ ॥ स्वगोत्ररुधिराचा पूर । पृथ्वीवरी वाहे दुस्तर । तेणें आम्हीं होऊं राज्यधर । हें कर्म घोर न करवे मज ॥ १२ ॥ कुळीं सुपुत्र वांछिजे जिहीं । बाण

—नराचा अवतार जो अर्जुन त्याच्या प्रश्नाशीं जुळणारा असा हा तुझा प्रश्न असल्यामुळें तो फारच उत्तम आहे, असें म्हणून भगवान् तीन श्लोकांनीं त्याला अनुमोदन देतात—

श्रीभगवान् उवाच–श्रीभगवान् म्हणाले, प्रश्नविदांवर–हे प्रश्नवेत्यांतील श्रेष्ठा ! विनशने–कुरुक्षेत्रांत, सपत्नैः युयुत्सुना अर्जुनेन वै–आपल्या शत्रूंशीं युद्ध करण्याची इच्छा करणाऱ्या अर्जुनानें, एवं एतत् प्रश्नं अहं पृष्टः–असाच प्रश्न मला विचारिला. ६.

पूर्वी जेव्हां दुर्योधनानें माझा तिरस्कार करून घनघोर युद्धाला आरंभ केला, तेव्हां अर्जुनानें मला हाच प्रश्न विचारिला होता. ५ शत्रूंचा नाश करण्यांत अत्यंत प्रतापी, धैर्यवान्, शूर, ज्ञानसंपन्न व प्रश्न करणारांमध्यें चतुर असा अर्जुन माझा आत्माच आहे, असें समज. ६ त्या अर्जुनानें कुरुक्षेत्रांत प्राणहारक युद्धाच्या वेळीं आपल्या स्वजनांच्या वधाच्या भीतीनें मला हाच प्रश्न केला होता. १०७.

—अर्जुनानें विभूतीविषयीं प्रश्न करावयास कोणता प्रसंग घडला !—

राज्यहेतुकं ज्ञातिवधं गर्ह्यं अधर्मं ज्ञात्वा–राज्याच्या निमित्तानें केलेला जो आपल्या ज्ञातीचा वध तो निंद्य अधर्म आहे, असें जाणून, अहं हंता अयं हतः इति लौकिकः सन् ततः निवृत्तः–मी मारणारा व हा मारला जाणारा, अशा-प्रकारें प्राकृतबुद्धि होऊन अर्जुन त्या ज्ञातिवधापासून निवृत्त झाला. तदा मे सः पुरुषव्याघ्रः युक्त्या प्रतिबोधितः सन् यथा त्वं एवं रणमूर्धनि मां अभ्यभाषत–जेव्हां तो पुरुषश्रेष्ठ ज्ञातिवधापासून निवृत्त झाला तेव्हां मजकडून युक्तीनें बोध केला गेलेला तो जसा तूं आतां प्रश्न करीत आहेस, त्याप्रमाणें तो संग्रामामध्यें मला विचारूं लागला. [यास्तव त्याच्या प्रमाणेंच मी तुला माझ्या विभूति सांगतों.] ७–८.

अर्जुन म्हणाला कीं, केवल राज्यलोभानें गुरु, कुल व वडील माणसें यांचा वध करणें मला अत्यंत निंद्य वाटतें; म्हणून मी प्राण गेला तरी यांच्याशीं युद्ध करणार नाहीं. ८ अर्जुनाच्या मनांत ' मी मारणारा व हे मरणारे ' या लौकिक समजुतीमुळें महामोहाची भ्रांति उत्पन्न झाली. ९ राज्यभोगाच्या इच्छेनें आप्त-बांधवांच्या वधाचें निंद्य कर्म करणें हा मला मोठा अधर्म वाटतो. त्यांत धर्माचा स्वधर्म बुडेल. ११० ज्यांच्या पायांचें तीर्थ प्रतिदिवशीं घ्यावें व श्रेष्ठ आसनावर बसवून ज्यांची पूजा करावी त्या पूज्य आप्त-इष्टांच्या हृदयांत तीक्ष्ण बाण खुपसून त्यांच्या रक्तानें माखलेल्या पृथ्वीचें राज्य भोगावें ! ११ आपल्याच आप्त-मित्रांच्या रक्तांचा भयंकर पाट जेव्हां पृथ्वीवर वहात जाईल, तेव्हां आम्ही राज्योपयोग घेऊं, असलें घोर कर्म माझ्यानें करवत नाहीं. १२ ज्या वाडवडिलांनीं कुळांत सुपुत्र

खोंचावे त्यांचे हृदयीं । यापरी पूर्वजां पाहीं । झालों उतरायी मानावें ॥ १३ ॥ ज्यांचें करावें श्राद्ध-तर्पण । त्यांचे बाणवरी घ्यावे प्राण । भलें पूर्वजां झालों उत्तीर्ण । आली नागवण निजधर्मा ॥ १४ ॥

संमत ॥ हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ॥

युद्धीं निमालिया स्वर्गगती । जयो आलिया राज्यप्राप्ती । दोन्ही नश्वरें गा श्रीपती । कोणें हितार्थी झुंझावें ॥ १५ ॥ ऐसेनि अनुतापें जाण । सांडूनियां धनुष्यबाण । शोकाकुलित अर्जुन । म्लान-वदन रणरंगीं ॥ १६ ॥ ते काळीं म्यांचि जाण । तो महावीरपंचानन । नाना युक्ती केलें समाधान । तेंही लक्षण अवधारीं ॥ १७ ॥ अर्जुना देह तितुका नश्वर । मळमूत्रांचें कोठार । करितां नाना उपचार । मरणतत्पर क्षणिक ॥ १८ ॥ जीव निज नित्य निर्मळ । अज अव्यय अचळ । अच्छेद्य अभेद्य अमळ । अचंचळ निजांगें ॥ १९ ॥ अर्जुना ऐक साचें । देहो तुझेनि प्रयत्नें न वांचे । जीव तुझेनि मारिला नवचे । पातक हत्येचें अहंभावें ॥ १२० ॥ हो कां त्वां असतें केलें । तरी तुझेनि जातें मारिलें । मी मारिता येणें बोलें । तुजाचि गोंविलें अभिमानें ॥ २१ ॥ जो देहाचा निर्माणकर्ता । तोचि तयाचा संहर्ता । तूं करण्यामारण्यापरता । व्यर्थ अहंता कां घेसी ॥ २२ ॥ जरी हे अहंता तूं न सांडिशी । तरी सकळ हत्येचीया राशी । साचचि आल्या तुजपाशीं । दोषी झालासी अर्जुना ॥ २३ ॥ ऐक पां बापा पार्था । देहादि कर्मांची अहंता । जो घे आपुले माथां । तो दोषी सवर्था तिहीं लोकीं ॥ २४ ॥ हो कां स्वधर्मचि तूं पुसशी । तरी ऐक क्षत्रियाच्या क्षात्रधर्मासी । समरांगणीं पित्यापुत्रांसी । वधितां क्षत्रियासी दोष नाहीं ॥ २५ ॥ युद्ध म्हणिजे स्वधर्मतीर्थ । समरांगणीं निमे तो नित्यमुक्त । जें तुज निजभाग्यें प्राप्त । तें तूं अहित मानिसी ॥ २६ ॥ कर्ता दोष अहंतेच्या माथां । ते जो नातळे देहअहंता । तोचि कर्मेंनि अकर्ता । भोगूनि

उत्पन्न होण्याची इच्छा केली, त्यांच्याच हृदयांत बाण खोंचून अशा प्रकारें आम्हीं पूर्वजांचे उतरायी व्हावें का ? १३ ज्यांचें श्राद्धतर्पण करावयाचें, त्यांचा बाणांनीं प्राण घ्यावयाचा, ही पूर्वजांच्या उपकाराची चांगलीच फेड म्हणावयाची ! खरोखर हें धर्माचें अतिक्रमण आहे. १४ ‘ युद्धांत मेलास तर स्वर्गाला प्राप्त होशील, जय मिळविलास तर पृथ्वीचें राज्य भोगशील. युद्धांत मरण आलें तर स्वर्गप्राप्ति व जय मिळाला तर राज्यप्राप्ति होईल,’ असें तूं म्हणतोस; पण श्रीकृष्णा ! तीं दोन्ही नश्वर आहेत. तेव्हां कोणत्या लाभासाठीं मीं युद्ध करावें ! १५ असें खेदानें बोलून हातांतील धनुष्य-बाण टाकून, शोकाकुल व म्लान वदन होऊन अर्जुन रणांगणांत बसला. १६ त्या वेळीं मींच त्या सिंहासारख्या महान् वीराचें ज्या अनेक युक्तींनीं समाधान केलें, तेंच तुला सांगतों, ऐक. १७ (भगवान् म्हणाले कीं,) हे अर्जुना ! ऐक. जेवढे देह तेवढे नश्वर आहेत. देह केवल एक घाणीचें भांडार आहे. त्याला कितीहि उपचार केले तरी तो क्षणिक व मरणाधीन आहे. १८ जीव (आत्मा) नित्य, शुद्ध, अज, अव्यय, अचल, अच्छेद्य, अभेद्य, निर्मल व स्वभावतःच स्थिर आहे. १९ यास्तव हे अर्जुना ! ऐक. तूं कितीहि प्रयत्न केलास तरी देह वांचणारा नाहीं व तुझ्या मारण्यानें आत्मा मरणारा नाहीं. तेव्हां हत्येचें पातक लागेल, हें केवल अहंकारामुळें तुला वाटत आहे. १२० यांनाच जर तूं उत्पन्न केलें असतेंस, तर तुझ्या मारण्यानें ते मेले असते. मी मारणार असें जें तुला वाटतें, तें केवल अभिमानामुळें होय. २१ जो देहाला निर्माण करितो, तोच त्याचा संहार करितो, असें असतां तूं जन्म देणारा व नाश करणारा नसून व्यर्थ अभिमान कशाला बाळगतोस ! २२ हे अर्जुना ! तूं जर हा अहंकार सोडिला नाहींस तर या सगळ्यांच्या हत्येच्या पातकांची रास तुझ्या माथीं येऊन तूं मोठा दोषी होशील. २३ बाबा पार्था ! ऐक. देहादि कर्मांची अहंता जो स्वतःवर घेतो, तो तिन्ही लोकांत दोषी होतो. २४ आतां तूं जर स्वधर्म विचारशील तर क्षत्रियांचा क्षात्रधर्म आतां ऐक. युद्धामध्यें स्वतःच्या पिता-पुत्रांचा जरी आपण वध केला, तरी त्यांत क्षत्रियांस दोष लागत नाहीं. २५ युद्ध हें क्षत्रियांचें धर्मतीर्थच आहे. जो रणांगणांत मरण पावतो, तो नित्य मुक्तच होतो. तुझ्या सुदैवानें अशी संधि तुला प्राप्त झाली असतां तूं त्याला अहित मानीत आहेस. २६ कर्तृत्वाचा दोष अहंतेच्या माथीं आहे. ती देह-अहंता जो टाकितो,

अभोक्ता तोचि एक ॥ २७ ॥ तोचि संगामाजी निःसंग । अवघें जग तो एकला साङ्ग । जो निरभिमानी अव्यंग । तो सौरा चांग समरंगीं ॥ २८ ॥ अर्जुना अभिमान सांडितां । तूं माझी पावशी समसाम्यता॥ तेव्हां सकळ पापाची वार्ता । तुज सर्वथा स्पर्शेना ॥ २९ ॥ म्हणशी केवीं जाय अहंता । तरी मज लक्षूनि तत्त्वतां । स्वधर्मं कर्मातें आचरितां । चित्तशोधकता तेणें होय ॥ १३० ॥ निर्मळत्व आलिया चित्ता । तो लागे माझिया भक्तिपंथा । भजनें माझिया समरसता । माझ्या निजभक्तां तत्काळ ॥ ३१ ॥ अर्जुना सांडावया अभिमान । तूं नाइकसी माझें वचन । तरी जन्ममरणांचें भूषण । सकळ दोष जाण भोगिसी ॥ ३२ ॥ तूं नित्यमुक्त अज अव्ययो । हा बुडेल तुझा सद्भावो । मग जन्ममरणांचा निर्वाहो । अविश्रम पहा हो भोगिसी ॥ ३३ ॥ यालागीं करणें न करणें दोन्ही । प्रकृतीचे माथां ठेवूनी । तूं कायावाचामनींहूनी । मज लागुनी शरण रिघें ॥ ३४ ॥ यापरी गा तत्त्वतां । सद्भावें शरण येतां । तुज सकळ कर्मांची वार्ता । मी सर्वथा शिवों नेदीं ॥ ३५ ॥ यालागीं गा कोदंडपाणी । मरतें मारितें सांडूनि दोन्ही । सौरा होयीं रणांगणीं । मी तुजलागोनि उद्धरीन ॥ ३६ ॥ तूं एक येथें कर्म करिता । मी एक तूतें उद्धरिता । ऐसें भिन्नत्व गा पार्था । माझ्या शरणागता असेना ॥ ३७ ॥ मज अनंता शरण येणें । आणि जीवत्वें वेगळें उरणें । तें गुळदगडाऐसें जिणें । अनन्यपणें नव्हे शरण ॥ ३८ ॥ सरिता सागरा शरण गेली । ते समुद्रचि होऊनि ठेली । पुढती परतावया मुकली । समरसिली सिंधुत्वें ॥ ३९ ॥ गंगा पावोनि सिंधुत्वासी । मागील यावा वंचीना तिसी । तेवीं सबाह्य आत्मसमरसीं । शरण अहर्निशीं अखंडत्वें ॥ १४० ॥ दीप दावाग्नी भेटों गेला । तो तेव्हडाचि होऊनि ठेला । तेवीं मजलागीं जो शरण आला । तो मीचि झाला अर्जुना ॥ ४१ ॥ पार्था परिस पां चिन्ह प्राप्ताचें । हें भूताकार मज अच्युताचें । ऐसें सद्भावें जो देखे साचें । त्यासी ब्रह्मसायुज्याचें साम्राज्य

तोच एक कर्म करूनहि अकर्ता व भोग भोगून अभोक्ता असतो. २७ संगांत असून तोच निःसंग असतो. जो अव्यंग निरभिमानी असतो तोच रणागणांतील खरा शूर होय. २८ हे अर्जुना, तूं अभिमान सोडिलास कीं, माझ्या स्वरूपाला प्राप्त होशील आणि कोणत्याहि पापाचा नुस्ता गंधहि तुला स्पर्श करणार नाहीं. २९ तूं म्हणशील कीं, अहंता कशी नाहींशी होईल? (तर ऐक.) माझें स्मरण करून स्वधर्माचरण केलें असतां चित्तशुद्धि होते १३० व चित्तशुद्ध झालें असतां तो माझ्या भक्तिमार्गाला अनुसरतो. नंतर भजनाच्या योगानें माझ्या भक्तांना तत्काल मत्स्वरूपाची प्राप्ति होते. ३१ अर्जुना! देहाभिमान टाकण्याविषयीं माझें वचन जर तूं ऐकणार नाहींस तर जन्म-मरणाला भूषणावह असलेले सगळे दोष तुला भोगावे लागतील. ३२ तूं नित्यमुक्त, अजन्मा व अविनाशी आहेस. हा तुझा सद्भाव नाहींसा होईल व तूं जन्म मरणाची परंपरा सतत भोगीत रहाशील. ३३ म्हणून तूं कर्म व अकर्म हीं दोन्हीं मायेच्या माथीं ठेवून काया-वाचा-मनानें मला शरण ये. ३४ याप्रमाणें तूं मला तत्त्वतः शरण आल्यास सगळ्या कर्मांची वार्ताहि मी तुझ्यापाशीं येऊं देणार नाहीं. ३५ यास्तव हे धनुष्यधारण करणाऱ्या अर्जुना! मरणारा व मारणारा हे दोन्ही भाव सोडून तूं रणगणांत शूर हो, म्हणजे मी तुझा उद्धार करीन. ३६ 'तूं एक कर्म करणारा व मी एक तुझा उद्धार करणारा' असा भेदभावहि मला शरण येणाऱ्यांत रहात नाहीं. ३७ पार्था! मज अनंताला शरण येऊन जीवत्वानें वेगळें रहाणें म्हणजे गुळांतील दगड गुळाशीं जसा एकरूप होत नाहीं, त्यासारखें आहे. तें अनन्य शरण येणें नव्हे. ३८ नदी समुद्राला शरण गेली. ती स्वतःच समुद्ररूप होऊन राहिली. ती तेथून मागें परतली नाहीं. समुद्राशीं एकरूप झाली. ३९ गंगा समुद्राला जाऊन मिळाली म्हणजे तिचा मागचा ओघ तिला मागें ओढीत नाहीं, त्याप्रमाणें मला शरण आलेला माझ्याशीं सतत अखंड एकरूप होतो. १४० दिवा दीपाग्नीला भेटावयास गेला व तद्रूप होऊन तेथेंच राहिला. त्याप्रमाणें हे अर्जुना! जो मला शरण येतो, तो मद्रूपच होतो. ४१ हे पार्था! मुक्त झालेल्या जीवाचें लक्षण ऐक. हीं सर्व भूतें मद्रूपच आहेत, असें जो सद्भावानें पहातो, त्याला सायुज्य मुक्तीचें

लाभे ॥ ४२ ॥ मज आत्मयाचे निजस्थितीं । संसार मुळीं मुख्य भ्रांती । तेथ मारिता मी हे मरती । कोणें हे युक्ती मानावी ॥ ४३ ॥ मृगजळ जेथें नसे । तेथें तंव कोरडेंचि असें । माझे ठायीं आभासे । तेथ तन्ही असे बोल्हासु कांहीं ॥ ४४ ॥ तेवीं संसाराचें रूप नाम । ठेवितां तेथें निखळ ब्रह्म । हाचि ज्याचा स्वभाव परम । तें चालतें ब्रह्म वर्ततां देहीं ॥ ४५ ॥ देहा जडत्वें न बधी कर्म । आत्मा नातळे धर्माधर्म । हें ज्यासी कळलें वर्म । तें चालतें ब्रह्म वर्ततां देहीं ॥ ४६ ॥ देहीं वर्ततां तो विदेह । विदेह तेंच त्याचें देह । हें माझें परम गुह्य । अर्जुनाशीं पाहें सांगितलें ॥ ४७ ॥ यापरी म्यां नाना युक्तीं । युद्धीं बोधिला सुभद्रापती । तेणेंही मज करोनि विनंती । पुशिल्या विभूती तुझ्याऐशा ॥ ४८ ॥ ज्या सांगीतल्या अर्जुनाशीं । त्याची मी सांगेन तुजपाशीं । ऐसें पुरस्करूनि उद्धवासी । निज-विभूती त्यासी सांगत ॥ ४९ ॥ उद्धवा ज्या पुशिल्या विभूती । त्या माझ्या मज न गणवती । मी जगदात्मा त्रिजगतीं । संख्यासंस्थिती गणी कोण ॥ १५० ॥

अहमात्मोद्धवामीषां भूतानां सुहृदीश्वरः । अहं सर्वाणि भूतानि तेषां स्थित्युद्भवाप्ययः ॥ ९ ॥

मी हृदयस्थ समर्थ हृदयीं । त्या मज जीवू मागे जें कांहीं । त्यासी विमुख मी नव्हें कंहीं । पुरवीं सर्वही ईश्वरत्वें ॥ ५१ ॥ जीवू अतिअडलेंपणें । जें मागे मजकारणें । तें मी त्यासी अलोट देणें । यालागीं म्हणणें ईश्वर मज ॥ ५२ ॥ मी आत्मा असें हृदयीं । हा विश्वास जयांसी नाहीं । ते मृगजळाचे डोहीं । नावेसकट पाहीं बुडबुडों गेलें ॥ ५३ ॥ तेथ नाव करावयाचे कष्ट । वृथा गेले फुकट । तेवीं साधनें सोसूनि कचट । साधनेंसकट बुडों गेले ॥ ५४ ॥ माझे प्राप्तीचें मुख्य वर्म । मी

साम्राज्य लाभतें. ४२ मज आत्म्याच्या स्वरूपांत संसारच मुळीं भ्रम आहे. तेथें 'मी मारणारा व हे मरणारे' हें बोलणें कोणत्या युक्तीनें खरें मानावें! जेथें मृगजल नसतें तेथील भूमि कोरडीच असते. याप्रमाणें माझ्या ठिकाणीं जें भासतें, तेथेंहि केवळ माझें स्वरूपच असतें. ४४ त्याचप्रमाणें संसाराचें नांव, रूप जें दिसतें तें वास्तविक शुद्ध ब्रह्मच आहे, असा ज्याचा दृढ विश्वास असतो, तो स्वतः जरी देहांत वागत असला तरी खरोखर तें चालतें ब्रह्मच आहे. ४५ देह जड असल्यामुळें त्याला कर्म बाधत नाहीं व आत्मा धर्माधर्माला कधीं स्पर्शहि करीत नाहीं, हें वर्म ज्याला कळलें तो स्वतःच देहांत रहाणारें चालतें ब्रह्म आहे. ४६ तो देहांत राहूनहि विदेही असतो व विदेह हाच त्याचा देह असतो. हें माझें परम गुप्त ज्ञान मीं अर्जुनाला सांगितलें. ४७ अशा रीतीनें मी अनेक प्रकारें अर्जुनाला रणांगणांत उपदेश केला. तेव्हां त्यानेंहि विनंति करून तुझ्या सारख्याच माझ्या विभूति विचारिल्या. ४८ त्यावेळीं मीं (अर्जुनाला) ज्या विभूति सांगितल्या, त्याच आतां तुला सांगतों, असें उद्धवाला आश्वासन देऊन भगवानानें आपल्या विभूति सांगितल्या. ४९ हे उद्धवा! तूं ज्या विभूति विचारिल्या आहेस, त्यांची गणति माझी मलाच करितां येत नाहीं. मी तर त्रिभुवनांतील जगदात्मा आहें. तेव्हां माझ्या विभूतींची संख्या दुसरा कोण सांगूं शकणार! १५०.

—भगवान् त्या विभूति सांगतात—

उद्धव–हे उद्धवा! अहं अमीषां भूतानां आत्मा, सुहृद्, ईश्वरः–मी या सर्व भूतांचा आत्मा, सुहृद् व स्वामी आहें. अहं सर्वाणि भूतानि–मीच सर्व भूतें आहें, तेषां स्थित्युद्भवाप्ययः–मी त्या भूतांची उत्पत्ति-स्थिति-लय यांचें निमित्त आहे. ९.

मी सर्वांच्या हृदयांत रहाणारा सर्वसमर्थ आहें. मजपाशीं जीव जें जें कांहीं मागतो, तें तें सगळें मी कधींहि नाकारीत नाहीं. माझ्या ईश्वरत्वानें तें सर्व मी पुरवितों. ५१ जीव अतिशय संकटांत सांपडून मजपाशीं जें कांहीं मागतो, तें मी त्याला भरपूर देतों. यास्तव मला ईश्वर असें म्हणतात. ५२ परंतु मी परमात्मा हृदयांतच आहें, असा ज्यांना विश्वास नसतो, ते मृगजळाच्या डोहांत नौकेसह बुडाले, असें समज. ५३ त्यांचे नौका तयार करण्याचे कष्ट जसे व्यर्थ जातात, त्याप्रमाणें अवघड साधनांचा त्रास सोसून अखेर ते

हृदयीं असें परब्रह्म । हेंचि ज्याचें नित्य कर्म । तो विभूति परम पैं माझी ।। ५५ ।। मी सर्वभूतहृदयवासी । सुहृद सोयरा मी सर्वांसी । मी नियंता ईश्वरसत्तेसी । नियामक भूतांसी मी एक ।। ५६ ।। एवं सर्वभूतांचा मी स्वामी । इयें सर्व भूतें तेंही मी । भूतांचे जन्मभूमीची मी भूमी । उत्पत्त्यादि कर्मीं मी कर्ता ।। ५७ ।। कृषीवळाचिये परी । मी सृजीं पाळीं संहारीं । ब्रह्मा विष्णु त्रिपुरारी । गुणावतारी मी एक ।। ५८ ।। कर्मांची जे क्रियाशक्ती । तेही मी म्हणे श्रीपती । हे सामान्यें बोलिली स्थिती । विशेष विभूति त्या ऐक ।। ५९ ।।

अहं गतिर्गतिमतां कालः कलयतामहम् । गुणानां चाप्यहं साम्यं गुणिन्यौत्पत्तिको गुणः ।। १० ।।

गतिमंतांमाजीं जे गती । ते मी ह्मणे लक्ष्मीपती । गतीसी माझेनि निजगती । जाण निश्चितीं उद्धवा ।। १६० ।। चेतनेनें सर्वां गती । ते चेतना चैतन्याची शक्ती । चेतनेस्तव इंद्रियप्रवृत्ती । एवं गतीची गती मी एक ।। ६१ ।। सकळ गतींची परम गती । प्राण्यासी मुख्यत्वें मुक्ती । ते मुक्तीसी मजमाजीं मुक्ती । एवं गतीची गती मी एक ।। ६२ ।। सुरनरां आकळिता । ते जाण काळाची सत्ता । त्या काळाचा मीं आकळिता । ते जाण तत्त्वतां महाकाळ ।। ६३ ।। तिहीं गुणांची समानावस्था । ते मी जाण गा निजभक्ता । अकृत्रिम गुण जो धर्मता । तो मी तत्त्वतां ह्मणे हरी ।। ६४ ।।

गुणिनामप्यहं सूत्रं महतां च महानहम् । सूक्ष्माणामप्यहं जीवो दुर्जयानामहं मनः ।। ११ ।।

साधनांसह बुडून जातात. ५४ मी असा हृदयांत आहें, हें जाणणें हीच माझ्या प्राप्तीची मुख्य खूण आहे हेंच भक्तांचें नित्यकर्म आहे. तो भक्त माझी श्रेष्ठ विभूति आहे. ५५ सर्व प्राण्यांच्या हृदयांत रहाणारा, सर्वांचा सुहृद् सोयरा, ईश्वरसत्तेचा नियंता व सर्व भूतांचें नियमन करणारा मीच एक आहें. ५६ याप्रमाणें मी सर्व भूतांचा स्वामी; हीं सर्व भूतेंहि मीच; प्राण्याच्या जन्मभूमीचें मूळ मी; उत्पत्ति-स्थिति-लय यांचा कर्ताहि मीच; ५७ मी शेतकऱ्याप्रमाणें, उत्पन्न करितों, पालन करितों व संहार करितों. ब्रह्मा, विष्णु व महेश या रूपानें गुणावतारी मी आहें. ५८ कर्मांची जी क्रियाशक्ति तीहि मीच आहे, असें श्रीपति म्हणाला. मी हीं तुला सामान्य रूपें सांगितलीं. आतां माझ्या विशेष विभूति ऐक. १५९.

अहं गतिमतां गतिः—मी गतिमानांची गति, अहं कलयतां कालः—मी वश करणारांमध्यें काल आहें. अहं गुणानां च अपि साम्यं—मी सत्वादिकांमध्यें साम्य म्ह० अव्याकृत आहें. गुणिनि औत्पत्तिकः गुणः—गुणवानांतील स्वाभाविक गुण मी आहें. १०.

गतिमान् लोकांतील जी गति, ती मीच श्रीपति आहें. माझ्यामुळेंच गतीला गतित्व प्राप्त होतें, हें निश्चित जाण. १६० ज्या चेतनेनें सर्वांना गति मिळते, ती चेतनाच माझी शक्ति आहे. चेतनेमुळें इंद्रियांची प्रवृत्ति होते. याप्रमाणें गतींची गति एक मी आहें. ६१ सगळ्या गतींमध्यें प्राण्यांना परम गति म्हणजे मुक्ति आहे. त्या मुक्तीचीहि मुक्तता मजमध्यें आहे. यास्तव गतींची गति मीच एक आहें. ६२ काळाची सत्ता देव व मानव यांचें आकलन करणारी आहे; पण त्या काळाचेंहि नियम करणारा मी महाकाळ आहें. ६३ सत्त्व-रज तम या तिन्ही गुणांतील साम्यावस्था मी आहें. हे माझ्या प्रिय भक्ता उद्धवा ! आकाशादिकांचा जो शब्दादि गुणरूप स्वाभाविक धर्म आहे तोहि मीच आहें असें श्रीहरि म्हणाला. १६४.

अहं गुणिनां अपि सूत्रं—मी सत्त्वादि गुणवानांतील सूत्र म्हणजे प्रथम कार्य आहें, अहं महतां च महान्—मी महान् पदार्थांतील महत्तत्त्व आहें. अहं सूक्ष्माणां अपि जीवः—मी सूक्ष्मवस्तूंतीलहि जीव आहें. (जीवाची उपाधि सूक्ष्म असल्यामुळें व तो दुर्ज्ञेय असल्यामुळें त्याला अति सूक्ष्मत्व आहे. सु. उ. श्वेता० पृ. १४६) अहं दुर्जयानां मनः—मी दुर्जयवस्तूंतील मन आहें. ११.

गुणी म्हणावया हेंचि कारण । ज्या मजमाजीं सूत्र क्रियाप्रधान । मायेचें प्रथमकार्य जाण । तो गुणी मी संपूर्ण उद्धवा ॥ ६५ ॥ जगीं आकाश थोर पाहीं । तें मजमाजीं खेळे लपंडायी । माझ्या महत्तत्त्वाची नवायी । मजही निश्चयीं नेमेना ॥ ६६ ॥ महत्तत्त्व जें ज्ञानप्रधान । तें मी ह्मणे नारायण । सूक्ष्मांमाजीं जीवू मी आपण । ब्रह्मादिकां जाण अतर्क्य ॥ ६७ ॥ दुर्जयांमाजीं मी मन । त्यासी जिंकावया जाण । मजवेगळी आंगवण । नाहीं संपूर्ण आणिकासी ॥ ६८ ॥ मज लक्षितां मन आकळे । मज विसरतां मन चौताळे । मन न धरवे वेदशास्त्रबळें । मन नाकळे मजवीण ॥ ६९ ॥ मन तेंचि मी आहें । मज चिंतितां तें विरोनि जाये । मज विसरतां तें पाहें । मन सैरा जाये सुनाट ॥ १७० ॥

हिरण्यगर्भो वेदानां मन्त्राणां प्रणवस्त्रिवृत् । अक्षराणामकारोऽस्मि पदानि च्छन्दसामहम् ॥ १२ ॥

वेद अध्यापक प्रसिद्ध । हिरण्यगर्भ मी म्हणे गोविंद । माझेनि जगीं अनुल्लंघ्य वेद । वेदवाद तोही मी ॥ ७१ ॥ ओंकारावीण मंत्रश्रेणी । ते जाण बाळकाची काहाणी । मंत्रीं ओंकार मी चक्रपाणी । सकळ मंत्र त्याचेनी पावन ॥ ७२ ॥ अकार उकार मकार । अर्धमात्रेसीं उच्चार । या नांव ' त्रिवृत् ओंकार ' । पावन मंत्र येणेंसीं ॥ ७३ ॥ अक्षरांच्या उच्चारासी । अकार लागला सर्वांसी । तो अकारू मी हृषी-केशी । जाण निश्चयेंसीं उद्धवा ॥ ७४ ॥ अक्षरीं अकार मी मुकुंदू । छंदांमाजीं गायत्री छंदू । ते मी म्हणे गोविंदू । यालागीं ब्रह्मवृंदू सेविती ॥ ७५ ॥ छंदांमाजीं गायत्री छंद । सकळ द्वंद्वांमाजीं निर्द्वंद्व । तो मी म्हणे गोविंद । पूज्य द्विजवृंद येणेंचि मज ॥ ७६ ॥

इन्द्रोऽहं सर्वदेवानां वसूनामस्मि हव्यवाट् । आदित्यनामहं विष्णू रुद्राणां नीललोहितः ॥ १३ ॥

उद्धवा ! मजमध्यें कर्मप्रधान सूत्राख्य मायेचें प्रथम कार्य रहातें, तो गुणी मीच आहें. मला गुणी म्हणण्याचें हेंच कारण आहे कीं, ६५ जगांत सर्वांत व्यापक असें आकाश आहे; पण तेंहि माझ्यामध्यें लपंडाव खेळतें. (म्ह० लोपून जातें.) माझ्या महत्स्वरूपाची अपूर्वता मलाहि निश्चयानें कळत नाहीं. ६६ ज्ञानप्रधान जें महत्तत्त्व तें मी नारायणच आहें. ब्रह्मदेवादिकांसहि अतर्क्य असलेला व सूक्ष्मांतील सूक्ष्म जो जीव, तो मीच आहें. ६७ जिंकण्यास कठिण असलेल्या वस्तूंमधील मन मीच आहें. ह्या मनाला जिंकावयास मजवांचून दुसरें कोणीहि समर्थ नाहीं. ६८ माझें स्मरण केलें असतां मन ताब्यांत रहातें व मला विसरलें असतां मन आवरेनासें होतें. केवल वेदशास्त्र पढल्यानें मन स्वाधीन होत नाहीं. माझ्यावांचून मन केव्हांहि ताब्यांत येत नाहीं. ६९ मन मीच आहें तेव्हां माझें चिंतन केलें असतां तें विरून जातें व मला विसरलें असतां तें स्वैरपणानें भलतीकडे भटकूं लागतें. १७०.

वेदानां हिरण्यगर्भः-मी वेदांतील सूक्ष्म-समष्टि अभिमानी हिरण्यगर्भ आहें. मंत्राणां त्रिवृत् प्रणवः-मंत्रांतील त्रिमात्र ओंकार आहें. अक्षराणां अकारः अस्मि—अक्षरांतील अकार मी आहें, अहं छंदसां पदानि—मी छंदांतील गायत्री आहें. १२.

गोविंद म्हणाला, वेद शिकविणारा जो प्रसिद्ध ब्रह्मदेव, तो मीच आहें. माझ्यामुळेंच जगांत वेद अनुल्लंघनीय झाला आहे. ज्याला वेदवाद म्हणतात, तो मीच आहें; ७१ ओंकारावांचून सर्वमंत्रांचा समूह लहान मुलांच्या कहाणी-सारखा आहे. मी चक्रपाणीच मंत्रांतील ओंकार आहें. माझ्यामुळेंच सर्व मंत्र पावन होतात. ७२ अकार, उकार, मकार व अर्धमात्रा याला त्रिवर्णात्मक ओंकार असें म्हणतात. यानेंच मंत्र पावन होतात. ७३ अक्षरांचा उच्चार करावयास ' अ -'कार अवश्य आहे. तो अकार मी हृषीकेश आहें, असें तूं जाण. ७३ अक्षरांतील अकार मी मुकुंदच आहें. छंदांतील मी गायत्री आहें. यास्तव ब्रह्मवृंद तिचें सेवन करितात. ७५ सगळ्या छंदांमध्यें गायत्री छंद व सगळ्या द्वंद्वांमध्यें निर्द्वंद्व, तो मीच गोविंद आहें. यामुळेंच ब्राह्मण मला पूज्य आहेत १७६.

अहं सर्वदेवानां इंद्रः—मी सर्व देवांतील इंद्र आहें. वसूनां हव्यवाड् अस्मि—मी वसूंतील अग्नि आहें. अहं आदित्यानां विष्णुः—मी आदित्यांतील विष्णु आहे. रुद्राणां नीललोहितः—मी रुद्रांतील शंकर आहें. १३.

देवांमाजीं मी इंद्र जाण । वसूंमाजीं मी हुताशन । आदित्यांमाजीं मी वामन । रुद्रांमाजी जाण नीललोहितू ॥ ७७ ॥

ब्रह्मर्षीणां भृगुरहं राजर्षीणामहं मनुः । देवर्षीणां नारदोऽहं हविर्धान्यस्मि धेनुषु ॥ १४ ॥

शापूनि ब्रह्मा अपूज्य केला । शिवाचा नैवेद्य त्यागविला । विष्णू हृदयीं लाता हाणिला । भृगु वाखाणिला श्रीवत्सें ॥ ७८ ॥ ब्रह्मऋषींमाजीं संपन्न । भृगु तो मी म्हणे श्रीकृष्ण । मनस्वरूपें मी आपण । राजर्षि जाण मुख्यत्वें ॥ ७९ ॥ देवर्षींमाजी मुनि नारद । तोही मी म्हणे गोविंद । कामधेनु अतिशुद्ध । स्वरूप प्रसिद्ध तें माझें ॥ १८० ॥

सिद्धेश्वराणां कपिलः सुपर्णोऽहं पतत्रिणाम् । प्रजापतीनां दक्षोऽहं पितृणामहमर्यमा ॥ १५ ॥

सिद्धांमाजीं कपिल मुनीश्वर । तो मी म्हणे सारंगधर । पक्ष्यांमाजीं खगेश्वर । तो मी श्रीधर गरुडरूपें ॥ ८१ ॥ प्रजापतींमाजीं मुख्य । कृष्ण म्हणे तो मी दक्ष । पितृगणांमाजीं अध्यक्ष । अर्यमा प्रत्यक्ष स्वरूप माझें ॥ ८२ ॥

मां विद्ध्युद्धव दैत्यानां प्रन्हादमसुरेश्वरम् । सोमं नक्षत्रौषधीनां धनेशं यक्षरक्षसाम् ॥ १६ ॥

भक्तिप्रतापें अतिअगाध । तो दैत्यांमाजीं मी प्रन्हाद । नक्षत्र औषधींचा जो स्वामी चंद्र । तें म्हणे गोविंद स्वरूप माझें ॥ ८३ ॥ यक्षराक्षसांमाजीं थोर । माझें स्वरूप तो कुबेर । ज्याचें विश्वासें निरंतर । असे भांडार हरीचें ॥ ८४ ॥

ऐरावतं गजेन्द्राणां यादसां वरुणं प्रभुम् । तपतां द्युमतां सूर्यं मनुष्याणां च भूपतिम् ॥ १७ ॥

देवांमध्यें मी इंद्र आहें. वसूंमध्यें मी अग्नि आहें. आदित्यांमध्यें मी वामन आहें. रुद्रांमध्यें मी शंकर आहें. १७७.

अहं ब्रह्मर्षीणां भृगुः—मी ब्रह्मर्षींतील भृगु, अहं राजर्षीणां मनुः—मी राजर्षींतील मनु, देवर्षीणां नारदः—देवर्षींतील नारद, अहं धेनुषु हविर्धानी अस्मि—मी धेनूंतील हविर्धानी कामधेनु आहें. १४.

ज्यानें ब्रह्मदेवाला शाप देऊन पूजेला अयोग्य ठरविलें, शंकराचा नैवेद्य निषिद्ध केला, विष्णूच्या हृदयावर लाथा हाणिल्या, पण त्यानें ज्याची श्रीवत्सानें वाखाणणी केली, ७८ तो ब्रह्मर्षींमध्यें पूज्य असलेला भृगु, मीच आहें, असें श्रीकृष्ण म्हणाला. राजर्षींमध्यें मनूच्या रूपानें मीच मुख्य आहें. ७९ देवर्षींमध्यें मी नारदमुनि आहें. कामधेनूहि माझेंच प्रसिद्ध शुद्धस्वरूप आहें. १८०.

सिद्धेश्वराणां कपिलः—मी श्रेष्ठ सिद्धांतील कपिलमुनि, अहं पतत्रिणां सुपर्णः—मी पक्ष्यांतील गरुड, अहं प्रजापतीनां दक्षः—मी प्रजापतींतील दक्ष, अहं पितृणां अर्यमा—व मी पितरांतील अर्यमा आहें. १५.

सिद्धांतील जो कपिल मुनि, तो मीच आहें. पक्ष्यांचा राजा जो गरुड, तोहि मीच श्रीधर आहें. ८१ प्रजापतींतील दक्ष मीच आहें. पितृगणांतील प्रमुख जो अर्यमा तेंहि माझेंच स्वरूप आहे. १८२.

हे उद्धव ! मां दैत्यानां प्रन्हादं असुरेश्वरं विद्धि—मी दैत्यांतील असुरेंद्र प्रल्हाद आहें असें तूं जाण, नक्षत्रौषधीनां सोम—नक्षत्रौषधींचा प्रभु सोम, यक्षरक्षसां धनेशं—यक्ष व राक्षस यांचा प्रभु कुबेर मी आहें. १६.

दैत्यांमध्यें भक्तीच्या प्रभावानें अति अगाध असलेला प्रल्हादहि मीच आहें. नक्षत्र व औषधी यांचा स्वामी जो चंद्र तेंहि माझेंच स्वरूप आहे. ८३ यक्ष-राक्षसांतील श्रेष्ठ व ज्याच्यावर हरीचा सगळा खजिना विश्वासलेला आहे, असा कुबेरहि मीच आहें. १८४.

गजेंद्राणां ऐरावतं—गजेंद्रांतील ऐरावत, यादसां वरुणं प्रभुं—जलजंतूंचा स्वामी वरुण, तपतां द्युमतां सूर्यं—ताप देणाऱ्या व दीप्तिमान् पदार्थांतील मी सूर्य आहें, मनुष्याणां च भूपतिं—व मनुष्यांतील राजा आहें. १७.

ऐरावत जो गजेंद्र। तो मी म्हणे यादवेंद्र। वरुण जो जळचरेंद्र। तें म्हणे उपेंद्र स्वरूप माझें ॥ ८५ ॥ स्वप्रभा प्रकाशनिष्ठ। जग प्रकाशूनि उद्भट। तो सूर्य मी म्हणे वैकुंठ। अतितिखट निजतेजें ॥ ८६ ॥ मनुष्यामाजीं जो भोगी क्षिती। सार्वभौम ज्याच्या हातीं। ज्यातें बोलती भूपती। ते माझी विभूती हरि म्हणे ॥ ८७ ॥

उच्चैःश्रवास्तुरङ्गाणां धातूनामस्मि काञ्चनम्। यमः संयमतां चाहं सर्पाणामस्मि वासुकिः ॥ १८ ॥

नागेन्द्राणामनन्तोऽहं मृगेन्द्रः शृङ्गिदंष्ट्रिणाम्। आश्रमाणामहं तुर्यो वर्णानां प्रथमोऽनघ ॥ १९ ॥

उच्चैःश्रवा तुरंगजाती। तो मी म्हणे कमळापती। सुवर्ण धातु माझी विभूती। जीलागीं लुलाती तिनी लोक ॥ ८८ ॥ दंडधारित्यांमाजीं गहन। यमधर्म मी आपण। सर्पांमाजीं जाण। मी नारायण वासुकी ॥ ८९ ॥ अनंत या नामातें जो धरी। तो नाग मी म्हणे श्रीहरी। नखदंष्ट्राशृंगधारी। त्यांमाजीं केसरी म्हणे देवो ॥ १९० ॥ चतुर्थाश्रम संन्यास जाण। तो मी म्हणे नारायण। वर्णाग्रज जे ब्राह्मण। ते मी ब्रह्म जाण बोलतें ॥ ९१ ॥

तीर्थानां स्रोतसां गङ्गा समुद्रः सरसामहम्। आयुधानां धनुरहं त्रिपुरघ्नो धनुष्मताम् ॥ २० ॥

तीर्थसरितांमाजीं गांग। तें मी म्हणे श्रीरंग। तडागीं श्रेष्ठ तडाग। समुद्र साङ्ग मी म्हणे हरी ॥ ९२ ॥ आयुधीं धनुष्य हतियेरें। तें मी म्हणे सारंगधर। त्रिपुरारि मी धनुर्धर। जेणें केला संहार त्रिपुरांचा ॥ ९३ ॥

यादवांतील श्रेष्ठ असा तो श्रीकृष्ण म्हणाला कीं, सर्वांत श्रेष्ठ हत्ती जो ऐरावत तो मीच आहें. जलचरांतील जो प्रमुख वरुण, तो मीच आहें. ८५ आपल्या प्रकाशानें जगाला प्रकाशित करणारा व आपल्या तेजानें अति प्रखर जो सूर्य तो मीच आहें, असें वैकुंठाधीश म्हणाला. ८६ मनुष्यांतील पृथ्वीचा भोग घेणारा जो श्रेष्ठ नर, ज्याच्या हातीं सगळ्या भूमीची सत्ता असते व ज्याला भूपति असें म्हणतात, तो सार्वभौम राजाहि माझीच विभूति आहे. १८७.

तुरङ्गाणां उच्चैःश्रवाः—अश्वांतील इंद्राचा उच्चैःश्रवा, धातूनां कांचनं अस्मि—धातूंतील सुवर्ण, अहं संयमतां च यमः—व दंड करणारांतील यम मी आहें. सर्पाणां वासुकिः अस्मि—सर्पांतील वासुकि मी आहें. अहं नागेंद्राणां अनन्तः—मी श्रेष्ठ सर्पांतील अनंत आहें. शृङ्गिदंष्ट्रिणां मृगेन्द्रः—शिंगें आणि दाढा यांनीं युक्त असलेल्या पशूंतील सिंह मी आहें. अनघ! —हे निष्पाप उद्धवा! अहं आश्रमाणां तुर्यः—मी आश्रमांतील संन्यास आहे. वर्णानां प्रथमः— मी चार वर्णांतील पहिला वर्ण ब्राह्मण आहें. १८-१९.

घोड्यांतील श्रेष्ठ अश्व जो उच्चैःश्रवा, तोहि मीच आहें, असें लक्ष्मीपति म्हणाला. ज्यासाठीं त्रिभुवनांतील लोक धडपड करीत असतात तें सोनेंहि मीच आहें. ८८ दंड धारण करणाऱ्यांतील अति उग्र जो यमधर्म, तो मीच आहें. सर्पांतील श्रेष्ठ वासुकि, मी नारायणच आहें. ८९ नागांतील अनंतहि मी श्रीहरीच आहें. नखें, दांत व शिंगें धारण करणाऱ्या हिंस्र पशूंतील केसरी मीच आहें. १९० चार आश्रमांतील उत्तम आश्रम जो संन्यास, तोहि मी नारायणच आहें. चारी वर्णांतील श्रेष्ठ वर्ण व साक्षात् ब्रह्मच असा जो ब्राह्मण, तोहि मी आहें. १९१.

अहं तीर्थानां स्रोतसां गङ्गा सरसां समुद्रः—मी तीर्थें व इतर जलप्रवाह यांतील गंगा व स्थिर जलाशयांतील समुद्र आहें. अहं आयुधानां धनुः धनुष्मतां त्रिपुरघ्नः—मी आयुधांतील धनुष्य व धनुष्य धारण करणारांतील शंकर आहें. २०.

नद्यांतील पवित्र तीर्थ असें जें गंगोदक, तेंहि मीच आहें. जलाशयांतील अतिशय विस्तृत असा जो समुद्र, तोहि मीच आहें. ९२ आयुधांतील मुख्य आयुध जें धनुष्य, तें मीच आहें. ज्यानें त्रिपुरांचा वध केला, तो धनुष्य धारण करणारा शंकरहि मीच आहें. १९३.

धिष्ण्यानामस्म्यहं मेरुर्गहनानां हिमालयः । वनस्पतीनामश्वत्थ ओषधीनामहं यवः ॥ २१ ॥

त्रिभुवननिवासस्थान महामेरू । तो मी म्हणे सारंगधरू । दुर्गमत्वें अतिदुर्धरू । तो मी हिमगिरिवरू म्हणे कृष्ण ॥ ९४ ॥ वृक्षांमाजीं जो अश्वत्थू । तो मी म्हणे श्रीकृष्णनाथू । औषधींमाजीं अतिविख्यातू यव मी अच्युतू म्हणे वेगें ॥ ९५ ॥

पुरोधसां वशिष्ठोऽहं ब्रह्मिष्ठानां बृहस्पतिः । स्कन्दोऽहं सर्वसेनान्यामग्रण्यां भगवानजः ॥ २२ ॥

श्रीरामपौरोहित्यें श्रेष्ठ । देवो म्हणे तो मी वसिष्ठ । वेदवेत्त्यांमाजीं उद्भट । सुरगुरु वरिष्ठ मी उद्धवा ॥ ९६ ॥ स्कंदसेनापतिशिरोमणी । तो मी म्हणे चक्रपाणी । स्वधर्मप्रवर्तकू अग्रगणी । वंद्य ब्राह्मणीं तो ब्रह्म मी ॥ ९७ ॥

यज्ञ नां ब्रह्मयज्ञोऽहं व्रतानामविहिंसनम् । वाय्वग्न्यर्काम्बुवागात्मा शुचीनामप्यहं शुचिः ॥ २३ ॥

यज्ञांमाजीं ब्रह्मयज्ञ । तो मी म्हणे सर्वज्ञ । देवर्षिपितृभूतगण । आब्रह्म भुवन जेणें तृप्त ॥ ९८ ॥ जीवमात्रासी पैं जाण । नेदावें दुःखवचन । व्रतांमाजीं जें अविहिंसन । तें मी श्रीकृष्ण स्वयें म्हणे ॥९९॥ एका वायूचेनि पवित्रपण । एक अग्नीस्तव पवित्र जाण । एकातें पवित्र करी जीवन । एक पावन वचनमात्रें ॥ २०० ॥ एक बुद्धीस्तव पवित्र जाण । या समस्तांमाजीं पवित्रपण । तें माझें स्वरूप म्हणे श्रीकृष्ण । पावना पावन मी एक ॥ १ ॥ जग माझेनि नामें पुनीत । हें सर्वांचें सर्व संमत । त्या माझें स्वरूप जें येथ । परम पुनीत पुनीतां ॥ २ ॥

अहं धिष्ण्यानां मेरुः—मी निवासस्थानांतील मेरु, गहनानां हिमालयः—दुर्गम प्रदेशांतील हिमालय आहें, अहं वनस्पतीनां अश्वत्थः ओषधीनां यवः—मी वृक्षांतील पिंपळ व वनस्पतींतील यव आहें. २१.

श्रीकृष्ण म्हणाले कीं, त्रिभुवनाचें निवासस्थान जो महामेरु पर्वत, तो मीच आहें. ज्याचें उल्लंघन करणें अति दुष्कर आहे, असा पर्वतश्रेष्ठ हिमालय मीच आहें. ९४ वृक्षांतील जो अश्वत्थ म्ह० पिंपळ तोहि मीच आहें. औषधींतील प्रसिद्ध जव मीच आहें, असें अच्युतानें मोठ्या त्वरेनें म्हटलें. १९५.

अहं पुरोधसां वसिष्ठः—मी पुरोहितांतील वसिष्ठ, ब्रह्मिष्ठानां बृहस्पतिः—मी वेदार्थनिष्ठांतील बृहस्पति आहें. अहं सर्वसेनान्यां स्कन्धः—मी सर्वसेनापतींतील कार्तिकस्वामि आहें. अग्रण्यां भगवान् अजः—सन्मार्ग प्रवर्तकांमध्यें भगवान मी आहें. २२.

श्रीरामचंद्राचा पुरोहितपणा केल्यामुळें ज्याला श्रेष्ठपणा प्राप्त झाला, असा वसिष्ठ ऋषीहि मीच आहें. वेदवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ असा देवांचा गुरु जो बृहस्पति, तो मीच आहें. ९६ सर्व सेनापतींचा नायक जो कार्तिकस्वामी, तो मीच. स्वधर्म प्रवर्तकांतील मुख्य व ब्राह्मणांमध्यें पूज्य असा ब्रह्मदेव, मीच आहें. १९७.

अहं यज्ञानां ब्रह्मयज्ञः—मी यज्ञांतील ब्रह्मयज्ञ. व्रतानां अविहिंसनम्—व्रतांतील अहिंसा आहें. अहं शुचीनां अपि वाय्वग्न्यर्काम्बुवागात्मा शुचिः—मी मार्जन, तासणें, घांसणें इत्यादि शोधक उपायांतीलहि वायु, अग्नि, सूर्य, जल व वाक् एतद्रूप शोधक—शुद्ध करणारा आहें. २३.

सर्वज्ञ श्रीकृष्णानें म्हटलें कीं, देव, ऋषि, पितर, भूतगण यांसह आब्रह्मस्तंभपर्यंत सगळी सृष्टि ज्यानें तृप्त होते, तो यज्ञांतील ब्रह्मयज्ञ मी आहें. ९८ कोणत्याहि प्राणिमात्रास केवळ शब्दानेंहि दुखवूं नये, असें जें व्रतांतील श्रेष्ठ अहिंसाव्रत तेंहि मी स्वतःच आहें. ९९ कोणाला वायूनें पवित्रपणा येतो, एखादी वस्तु अग्नीनें पवित्र होते, एखादी पाण्यानें शुद्ध होते, तर कोणी नुसत्या शब्दानें २०० व कोणी बुद्धीनें पावन होतात. या सर्वांतील जो पवित्रपणा, तें माझेंच स्वरूप आहे. कारण पावनाला पावनत्व देणारा मीच एक आहें. १ माझ्या नांवानेंच जगत् पवित्र होतें, हें सर्वांना संमत आहे, त्या माझें स्वरूप सर्व पावनांहूनहि पावन आहे. २०२.

योगानामात्मसंरोधो मन्त्रोऽस्मि विजिगीषताम् । आन्वीक्षिकी कौशलानां विकल्पः ख्यातिवादिनाम् ॥ २४ ॥

विविध योगांमाजीं आत्मरोधू । तो योग म्हणे मी गोविंदू । जेणें प्रकटे परमानंदू । समाधिबोधू साधकां ॥ ३ ॥ मुख्यत्वें विवेक धरोनि हातीं । जो न्यायता विजयो वांछी चित्तीं । ते नीतीची नीति मी श्रीपती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ४ ॥ आत्मनात्मविवेक केवळ । ते आन्वीक्षिकी विद्या कुशळ । ते विद्या म्हणे मी गोपाळ । विवेक प्रबळ माझेनी ॥ ५ ॥ वादांमाजीं वाद अनंत । जेथ विकल्पा नाहीं अंत । तो वादु मी म्हणे अच्युत । ऐक निश्चित विकल्प ॥ ६ ॥ अख्याति अन्यथाआख्याती । शून्यख्याती सत्ख्याती । अनिर्वचनीय जे ख्याती । तो वादू निश्चितीं मी उद्धवा ॥ ७ ॥

स्त्रीणां तु शतरूपाहं पुंसां स्वायंभुवो मनुः । नारायणो मुनीनां च कुमारो ब्रह्मचारिणाम् ॥ २५ ॥

शतरूपा आणि मनू । इयें दोनी मी म्हणे जनार्दनू । मुनींमाजीं मी नारायणू । बदरीसेवनू सदा असें ॥ ८ ॥ नैष्ठिक ब्रह्मचर्यधर । माझें स्वरूप सनत्कुमार । स्वयें सांगताहे श्रीधर । जाण साचार उद्धवा ॥ ९ ॥

धर्माणामस्मि संन्यासः क्षेमाणामबहिर्मतिः । गुह्यानां सूनृतं मौनं मिथुनानामजस्त्वहम् ॥ २६ ॥

भूतां अभयदानउपक्रमू । सर्वांभूतीं मी आत्मा परमू । हा संन्यासाचा मुख्य धर्मू । तो धर्म पुरुषोत्तमू स्वयें मी म्हणे ॥ २१० ॥ भूतांसी काया वाचा मनें । दुःख नेदूनि सुख देणें । या नांव

योगानां आत्मसंरोधः—मी अष्टांगयोगांतील चित्तनिरोधरूप समाधि आहें. विजिगीषतां मन्त्रः अस्मि—शत्रूंना जिंकण्याची इच्छा करणाऱ्या राजांतील नीति मी आहें, कौशलानां आन्वीक्षिकी—विवेकादिकांतील जी निपुणता तिच्यांतील आत्मानात्म विद्या मी आहें. ख्यातिवादिनां विकल्पः—अख्याति, अन्यथा ख्याति, असत्ख्याति, आत्मख्याति, अनिर्वचनीय ख्याति इत्यादि ख्यातींतील विकल्प म्ह० हें असें आहे कीं असें, अशाप्रकारचा उभयकोटिक आक्षेप मी आहें. २४.

गोविंदानें म्हटलें कीं, नाना प्रकारच्या योगांतील साधकाला परमानंद देणारा व समाधीचें ज्ञान करून देणारा जो चित्तनिरोधरूप योग तो मीच. हे उद्धवा ! ३ मुख्यत्वें विवेकाला हातीं धरून नीतीनें जय मिळविण्यास जो इच्छितो, त्याच्या नीतीचीहि नीति मीच आहें. ४ केवळ आत्मानात्म्याचा विचार करणारी जी अध्यात्मविद्या, ती मीच. माझ्यामुळेंच विचार दृढ होतो. ५ वादांत असंख्य वाद आहेत, त्यांत विकल्पाला अंतच नाहीं. तो वाद मीच व त्यांतील वितंडाहि मीच आहें. उद्धवा ! ६ अख्याति, अन्यथाख्याति, आत्मख्याति, सत्ख्याति आणि अनिर्वचनीय ख्याति या सर्व मीच आहें, हें निश्चयानें समज. २०७.

अहं स्त्रीणां तु शतरूपा पुंसां स्वायंभुवः मनुः—मी स्त्रियांतील शतरूपा आहें. पुरुषांतील स्वायंभुव मनु आहें. मुनीनां च नारायणः-मुनींतील नारायण, ब्रह्मचारिणां कुमारः—ब्रह्मचाऱ्यांतील मी सनत्कुमार आहें. २५.

जनार्दन पुढें म्हणतो कीं, मनु व शतरूपा हीं दोन्हीं मीच आहें. निरंतर बदरिकाश्रमीं रहाणारा मुनींतील नारायण मीच आहें. ८ उद्धवा ! श्रेष्ठ, नैष्ठिक ब्रह्मचर्य धारण करणारा जो सनत्कुमार तो माझेंच स्वरूप आहे. २०९.

धर्माणां संन्यासः अस्मि—धर्मांतील भूतांना अभयदान, एतद्रूप संन्यास मी आहें. क्षेमाणां अबहिर्मतिः—अभयस्थानांतील अंतर्निष्ठा मी आहें. गुह्यानां सूनृतं मौनं—गुह्यांतील प्रिय वचन व मौन मी आहें. (प्रिय भाषण व मौन यांमध्यें पुरुषाचा आशय व्यक्त होत नाहीं हें प्रसिद्ध आहे.) मिथुनानां तु अहं अजः—स्त्री व पुरुष या जोडप्यांतील मी प्रजापति आहें. [ज्याच्या दोन देहार्धांपासून शतरूपा व मनु या नांवाचें पहिलें मिथुन झालें तोच प्रजापति मुख्य जोडपें आहें.) २६.

सर्व प्राणिमात्रांत असणारा आत्मा मीच आहें. हें जाणून सर्व भूतांस काया-वाचा-मनानें अभय देणें हाच संन्यासाचा मुख्य धर्म आहे. तो धर्म स्वतः मीच आहें, असें पुरुषोत्तम म्हणाला. २१० कोणत्याहि प्राण्यास

संन्यासधर्म म्हणणें । तो धर्म मी म्हणे गोविंद ।। ११ ।। अंतरीं शुद्ध नाहीं बोध । दांत चावूनि साहतां द्वंद्व । ते क्षमा नव्हे शुद्ध । ऐक विनोद क्षमेचा ।। १२ ।। अंतरीं ठसावलें परब्रह्म । बाह्य सर्वां भूतीं जाहला सम । ते क्षमा मी म्हणे पुरुषोत्तम । द्वंद्वाराम बाधीना ।। १३ ।। असत्य पापी सकळ सृष्टीं । असत्यामाजीं पापकोटी । असत्याची खोटी गोठी । जो तो पोटीं सांडीना ।। १४ ।। उभय लौकिकीं खोटेपणें । असत्य बहिर्मुख नाणें । तें मनींहूनि जेणें सांडणें । तो म्यां श्रीकृष्णें वंदिजे ।। १५ ।। तें गुह्यांमाजीं अतिगुह्य जाण । सत्य वाचा कां मनींहूनि मौन । तें मी म्हणे मधुसूदन । सत्यप्रिय जाण निजगुह्य ।। १६ ।। स्रष्ट्याचे देह द्विधा जाण । मनु शतरूपा मूळमिथून । तें मी म्हणे नारायण । मनुष्य-स्रजन सद्भावें ।। १७ ।।

संवत्सरोऽस्म्यनिमिषामृतूनां मधुमाधवौ । मासानां मार्गशीर्षोऽहं नक्षत्राणां तथाऽभिजित् ।। २७ ।।

सावधानें अविकळ । न चुकतां पळें पळ । संवत्सरात्मक जो काळ । तो मी गोपाळ स्वयें म्हणे ।। १८ ।। त्रसरेणूपासूनि जाण । लवनिमिषदिनमान । संवत्सरवरी सावधान । गणीं मी संकर्षण काळ-गणना ।। १९ ।। मधुमाधववसंतयुक्तू । कृष्ण ह्मणे तो मी ऋतू । मार्गशीर्ष मी मासांआंतू । जो धान्य-पाकयुक्तू आल्हादी ।। २२० ।। गणितां न ये पंचांगांत । नक्षत्रीं असोनि सदा गुप्त । अव्यक्त परी सज्ञान प्राप्त । तें मी अभिजित म्हणे हरी ।। २१ ।।

अहं युगानां च कृतं धीराणां देवलोऽसितः । द्वैपायनोऽस्मि व्यासानां कवीनां काव्य आत्मवान् ।। २८ ।।

दुःख न देतां सुख देणें यालाच संन्यासधर्म असें म्हणतात. तो धर्म मी गोविंदच आहें. ११ अंतःकरणांत शुद्ध ज्ञान झालेलें नसतें व जो दांत-ओंठ चावून सुखदुःखादि द्वंद्व सहन करितो, त्याची ती खरोखर शुद्ध क्षमा नव्हे. ती क्षमेची थट्टा आहे. आतां क्षमेचें कौतुक ऐक. १२ ज्याच्या अंतःकरणांत परब्रह्म ठसलेलें असतें व जो बाहेर सर्व भूतांबरोबर सम होतो, त्याची क्षमावृत्ति हें माझेंच स्वरूप आहे. त्याला द्वंद्वसमूह बाधत नाहीं. १३ असत्यवादी सगळ्या सृष्टींत पापी होय. असत्यामध्यें कोट्यवधि पातकें भरलेलीं असतात. असत्यभाषण करणाराची खोटी गोष्ट कोणीहि मनावर घेत नाहीं. १४ बहिर्मति असणें हेंच असत्य, तें इह व परलोकीं खोट्या नाण्या-सारखेंच आहे. तें जो मनांतून घालवितो, त्याला मी श्रीकृष्ण वंदन करितों. १५ सत्य भाषण करणें किंवा मनः-पूर्वक मौन धरणें हेंच गुह्यांतील अतिगुह्य आहे. तें गुह्य मीच आहें. कारण सत्यप्रियत्व हेंच माझें गुह्य आहे. १६ प्रजापतीचा देह दोन प्रकारें विभागून मनु व शतरूपा हें जें आरंभींचें मनुष्यसृष्टि उत्पन्न करणारें पहिलें दाम्पत्य, तेंहि मीच आहें. २१७.

अनिमिषां संवत्सरः अस्मि—अप्रमत्तांतील संवत्सर मी आहें. ऋतूनां मधुमाधवौ—ऋतूंतील चैत्र व वैशाख या दोन महिन्यांनीं होणारा वसंतऋतु मी आहें. अहं मासानां मार्गशीर्षः—मी मासांतील मार्गशीर्ष आहें. तथा नक्षत्राणां अभिजित्—त्याचप्रमाणें नक्षत्रांतील उत्तराषाढेचा चवथा पाद व श्रवणाचा पहिला पाद मिळून अभिजित् नक्षत्र मी आहें. २७.

एक पळभरहि न चुकतां सतत सावधान असणारा संवत्सररूपी काळहि मी गोपाळच आहें. १८ सूर्य-किरणांमधून दिसणारे सूक्ष्म परमाणु जे त्रसरेणु त्यांपासून क्षण, पळ, घटी, प्रहर, दिवस इत्यादि संवत्सरापर्यंत सावधानपणानें कालगणना करणारा मी संकर्षण आहें. १९ चैत्र वैशाख यांनीं युक्त असलेला वसंतऋतु मीच आहें. धान्य पिकविणारा व आनंद देणारा मासांतील मार्गशीर्ष मास मीच आहें. २२० गणितानें जें पंचांगांत सांपडत नाहीं, नक्षत्रांत असूनहि सदा गुप्त असतें, पण अव्यक्त असूनहि सज्ञानाला प्राप्त होणारें असें जें अभिजित्, (उत्तराषाढेचा चवथा पाद व श्रवणाचा पहिला पाद) तें मीच आहें. २२१.

युगानां अहं कृतं—युगांतील मी कृतयुग आहें. धीराणां देवलः असितः—बुद्धिमानांतील देवल असित आहें. व्यासानां द्वैपायनः अस्मि—व्यासांतील सत्यवतीसुत कृष्णद्वैपायन मी आहें. कवीनां आत्मवान् काव्यः—विद्वानांतील ज्ञानी शुक्र मी आहें. २८.

युगांमाजीं कृतयुग । तें मी म्हणे श्रीरंग । जेथ संपूर्ण धर्म साङ्ग । अधर्मभाग असेना ॥ २२ ॥ निजधैर्य अतिअद्भुत । असित देवल धैर्यवंत । तो मी म्हणे गा अच्युत । जाण निश्चित उद्धवा ॥ २३ ॥ वेदविभागी राजहंस । जो कां द्वैपायन व्यास । तो मी म्हणे हृषीकेश । निवडूनि द्विजांस दीधले वेद ॥ २४ ॥ कवि त्यांमाजीं परमार्थज्ञाता । उशना कवी जाण तत्त्वतां । तो मी म्हणे रमाभर्ता । निजात्मकविता मी शुक्र ॥ २५ ॥

वासुदेवो भगवतां त्वं तु भागवतेष्वहम् । किंपुरुषाणां हनुमान्विद्याध्राणां सुदर्शनः ॥ २९ ॥

षड्गुणभाग्यें भाग्यवंत । पूर्णांशें जो भगवंत । वासुदेवनामें विख्यात । जाण तो मी येथ श्रीकृष्ण ॥ २६ ॥ भागवतांमाजीं अतिगहन । उद्धवा तूं तो मीचि जाण । ऐसें बोलतां श्रीकृष्ण । उद्धवें श्रीचरण वंदिले ॥ २७ ॥ उद्धवें करितां नमन । कृष्णें दीधलें आलिंगन । आनंदें कोंदलें त्रिभुवन । स्वानंदघन तुष्टला ॥ २८ ॥ उद्धव आणि श्रीकृष्ण । दोनी एक जाहले जाण । 'मी तो तूं' जे बोलिला श्रीकृष्ण । तें उद्धवासी आपण सत्यत्वें दावी ॥ २९ ॥ दोघांचें मोडलें दोनीपण । उद्धव जाहला श्रीकृष्ण । श्रीकृष्णाअंगीं उद्धवपण । संपूर्ण जाण बाणलें ॥ २३० ॥ तेणें उद्धव झाला विस्मित । नावेक श्लाघला आपणांत । मीच कृष्णाचा प्रिय भक्त । हें जाणोनि अनंत बोलिला ॥ ३१ ॥ वानरांमाजीं हनुमंत । तो मी म्हणे कृष्णनाथ । तंव उद्धव जाहला गर्वहत । लाजला पोटांत ते काळीं ॥ ३२ ॥ जेथ वानर आणि वनचर । मजहूनि कृष्णाचे प्रियकर । न कळे हरिभक्तांचा पार । मी कोण किंकर ते ठायीं ॥ ३३ ॥ ऐसें विचारूनि चित्ता । सवेंचि नमिलें कृष्णनाथा । तुझ्या विभूति अचुंबिता । कृपेनें तत्त्वतां

श्रीकृष्ण म्हणाला कीं, युगांमध्यें जेथें सांगधर्म पूर्ण आहे, अधर्माचा लेशहि नाहीं, असें जें कृतयुग तें मी आहें. २२ आपल्या धैर्यानें अति अद्भुत धैर्यवान् जो असित देवल, तो मी अच्युत आहें. २३ जो वेदविभाग करणारा जणुंकाय राजहंसच, ज्यानें वेदांची निवड करून ते द्विजांना वांटून दिले, तो द्वैपायन व्यास मीच आहें. २४ श्रेष्ठ कवींमध्यें परमार्थ जाणणारा उशनाकवि शुक्राचार्य तो मीच रमापति आहें. २२५.

भगवतां अहं वासुदेवः–उत्पत्ति–प्रलय, भूतांचा जन्म-नाश, विद्या-अविद्या यांना जो जाणतो तो भगवान् या लक्षणांनीं युक्त असलेल्या भगवानांतील वासुदेव मी आहें. भागवतेषु तु त्वं अहं–भगवद्भक्तांतील जो तूं तो मीच आहें. किंपुरुषाणां हनुमान्–कपि जातींतील हनुमान मी आहें. विद्याध्राणां सुदर्शनः–विद्याधरांतील मी सुदर्शन आहें. २९.

षड्गुणैश्वर्यसंपन्न, पूर्णांशानें अवतार घेतलेला, वासुदेव या नांवानें प्रसिद्ध असलेला, भगवान्‌हि मीच येथें श्रीकृष्णरूपानें वसत आहें; २६ आणि हे उद्धवा ! भगवद्भक्तांतील श्रेष्ठ भक्त जो तूं तोहि मीच आहें. हे श्रीकृष्णाचे शब्द ऐकतांच उद्धवानें त्याच्या पूज्य चरणांना वंदन केलें. २७ उद्धवानें याप्रमाणें वंदन करितांच श्रीकृष्णानें त्याला आलिंगन दिलें. त्या वेळीं सर्व त्रिभुवन आनंदानें भरून गेलें व स्वानंदघन परमात्मा संतुष्ट झाला. २८ उद्धव आणि श्रीकृष्ण हे दोघे एक होऊन 'मी तोच तूं' असें जें श्रीकृष्ण म्हणाला, तें त्यानें स्वतःच उद्धवाला खरें करून दाखविलें. २९ त्या दोघांचें द्वैत नाहींसें होऊन, उद्धव श्रीकृष्ण झाला व श्रीकृष्णाच्या अंगीं उद्धवपण पूर्णपणें बाणलें. २३० त्यामुळें उद्धव विस्मित झाला व 'मीच काय तो एक श्रीकृष्णाचा प्रिय भक्त' असें मनांत समजून तो क्षणभर गर्वानें फुगला. तें ओळखून श्रीकृष्ण म्हणाला कीं, ३१ वानरांतील जो भक्तश्रेष्ठ हनुमान्, तो मीच आहें. हें ऐकतांच उद्धव लगेच गर्वरहित झाला व मनांत अतिशय लाजला. ३२ 'जेथें वानर व वनचर प्राणी श्रीकृष्णाला माझ्याहूनहि अधिक प्रिय वाटतात, तेथें हरिभक्तांचा पारच कळत नाहीं, त्यांच्यापुढें मज किंकराचा काय पाड !' असा मनांत विचार करून त्यानें लगेच श्रीकृष्णनाथाला नमस्कार केला

मज सांग ॥ ३४ ॥ तंव हांसोनि श्रीधर । काय बोलिला उत्तर । सुदर्शन जो विद्याधर । तो विभुति साचार पैं माझी ॥ ३५ ॥

रत्नानां पद्मरागोऽस्मि पद्मकोशः सुपेशसाम् । कुशोऽस्मि दर्भजातीनां गव्यमाज्यं हविःष्वहम् ॥ ३० ॥

रत्नांमाजीं जो पद्मराग । तो मी म्हणे श्रीरंग । मनोहरांमाजीं अव्यंग । हरि म्हणे सांग पद्मकळा तो मी ॥ ३६ ॥ दशदर्भांमाझारीं । कुश तो मी म्हणे श्रीहरी । सकळ हविषांच्या शिरीं । गोघृत श्रीहरि स्वयें मी म्हणे ॥ ३७ ॥

व्यवसायिनामहं लक्ष्मीः कितवानां छलग्रहः । तितिक्षाऽस्मि तितिक्षूणां सत्त्वं सत्त्ववतामहम् ॥ ३१ ॥

व्यवसायाचे व्यवस्थिती । दानयुक्त अतिसंपत्ती । ते लक्ष्मी मी म्हणे श्रीपती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ३८ ॥ कपटाचिये कपटगती । अगम्य जे छळणस्थिती । तो मी कृष्ण मायिकमूर्ती । अतर्क्य युक्ती छळणाची ॥ ३९ ॥ ब्रह्माचे अंगीं निजजीविता । जीवासी ब्रह्मसायुज्यता । त्या कपटाचा मीचि कर्ता । देवांदेवतां अतर्क्य ॥ २४० ॥ आम्ही मायानियंते म्हणविती । तो शिवू ठकिला मोहिनी-प्रती । ब्रह्मा ठकिला वत्साहरणार्थीं । ठकडा निश्चितीं मी एकू ॥ ४१ ॥ सहनशीळीं सहनशक्ती । ते म्हणे कमळापती । सात्विकांची निजसत्ववृत्ती । ते मी श्रीपति स्वयें म्हणे ॥ ४२ ॥

ओजःसहो बलवतां कर्माहं विद्धि सात्त्वताम् । सात्त्वतां नव मूर्तीनामादिमूर्तिरहं परः ॥ ३२ ॥

व म्हणाला कीं, कृपाकरून तुझ्या सर्व विभूति मला पूर्णपणें सांग. ३४ तेव्हां श्रीकृष्णानें हंसून उत्तर दिलें कीं, जो विद्याधर सुदर्शन तो माझीच विभूति आहे. २३५.

रत्नानां पद्मरागः अस्मि—रत्नांतील पद्मराग मी आहें. सुपेशसां पद्मकोशः—सुंदर पदार्थांतील कमलकोश मीं आहें. दर्भजातीनां कुशः अस्मि—काश, शर, दूर्वा इत्यादि दर्भजातींतील दर्भ मी आहें. हविःषु अहं गव्यं आज्यं—चरु-पुरोडाशादि किंवा सामान्य घृत, या हवींतील गायीचें घृत मी आहें. ३०.

श्रीरंग पुढें म्हणाला कीं, रत्नांतील जो पद्मराग तो मीच आहें. मनोहर वस्तूंतील अव्यंग असा जो कमळाचा कळा, तो मी आहें. ३६ दहा दर्भांतील कुश मी. होमद्रव्यांतील मुख्य जें गायीचें तूप, तेंहि मीच आहें. २३७.

व्यवसायिनां अहं लक्ष्मीः—उद्योगी पुरुषांतील धनादि संपत्ति मी आहें. कितवानां छलग्रहः—जुगारी लोकांतील द्यूत मी आहें. तितिक्षूणां तितिक्षा अस्मि—तितिक्षावानांतील सहनशीलता मी आहें. अहं सत्त्ववतां सत्त्वं—सत्त्ववानांतील सत्त्व मी आहें. ३१.

उद्योगधंदा करणारांची दान देण्यास योग्य अशी जी अलोट संपत्ति, ती मीच आहें. हे उद्धवा ! ३८ कपटांतील जी कपटयुक्ति, छळ करण्याची अगम्य युक्ति अशी जी मायेची, मूर्तीच, तीहि मी श्रीकृष्णच आहें. ३९ परब्रह्माच्या ठिकाणीं जीवाची कल्पना व जीवाचें ब्रह्मस्वरूपाशीं ऐक्य, त्या कपटाचा कर्ताहि मीच आहें. देव व देवता यांना तें अतर्क्य आहे. २४० जो स्वतःला मायेचा नियंता म्हणवितो, तोहि मोहिनीला पाहून फसला. ब्रह्मदेव गायींचीं वासरें चोरून तोंडघशीं पडला. त्या दोघांनाहि ठकविणारा मीच. ४१ लक्ष्मीपति श्रीकृष्ण म्हणाला कीं, सहनशीलांतील सहनशक्ति मीच आहें. सात्त्विकांची जी मूळ सत्त्ववृत्ति, तीहि मीच आहें. २४२.

बलवतां ओजःसहः—बलवानांतील शारीर व मानस बल मी आहें. अहं सात्त्वतां कर्म विद्धि—मी भागवतांतील भक्तीनें केलेलें कर्म आहें, असें जाण. सात्त्वतां नवमूर्तीनां अहं परः आदिमूर्तिः—त्याच भगवद्भक्तांच्या नवव्यूहार्चनांतील श्रेष्ठ वासुदेवाख्य आदिमूर्ति मी आहें. [वासुदेवादि नऊ मूर्तींची सविस्तर नांवें भावार्थांत आलीं आहेत.] ३२.

बळवंतांच्या ठायीं प्रबळ । मनोबळ शरीरबळ । धैर्यबळ तें मी गोपाळ । जेणें अळुमाळ डंडळीना ॥ ४३ ॥ भक्तांच्या ठायीं भजनकर्म । जेणें माझें अनिवार प्रेम । तें कर्म म्हणे मी पुरुषोत्तम । भक्तकामनिर्दळणू ॥ ४४ ॥ नव व्यूह अर्चनस्थिती । सात्वतां ज्या नव मूर्ती । त्यांत वासुदेव प्रथमस्थिती । ऐक व्युत्पत्ती नवांची ॥ ४५ ॥ वासुदेव संकर्षण । अनिरुद्ध आणि प्रद्युम्न । हयग्रीव नारायण । वराह वामन नरसिंह ॥ ४६ ॥ हे नवव्यूहांची व्युत्पत्ती । यांमाजीं मी प्रथम मूर्ती । येर आठही माझ्या विभूती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ४७ ॥ हयग्रीव वेदमूर्ती । तेथें श्रीव्यासें करूनि भक्ती । वेदव्यासपदप्राप्ती । हे केली ख्याती तिहीं लोकीं ॥ ४८ ॥ नारायण निजमूर्ती । स्रष्टयानें करूनि त्याची भक्ती । चतुःश्लोकीं ज्ञानस्थिती । पावोन निश्चितीं ब्रह्मत्वा आला ॥ ४९ ॥ श्वेतवराह महामूर्ती । धरेनें करूनि पूर्ण भक्ती । तीस उद्धरूनि कृपामूर्ती । अभिनव शांती अर्पिली ॥ २५० ॥ माझी निजमूर्ती वामन । देवीं करूनि पूर्ण भजन । त्यांच्या छळें बळी बांधोन । देवांचा सन्मान स्वाधिकार केला ॥ ५१ ॥ नरहरि दिव्यमूर्ती । प्रऱ्हादें करूनि अनन्यभक्ती । मी सर्वात्मा सर्वांभूतीं । लोकां प्रतीती विश्वासिली जेणें ॥ ५२ ॥ संकर्षण श्रेष्ठमूर्ती । ब्रह्माज्ञा रैवतें केली भक्ती । अर्पूनिया रेवती । स्वानंदस्थितीं निवाला ॥ ५३ ॥ प्रद्युम्न काममूर्ती । सकाम कामुकी करूनियां भक्ती । जे जे काम वांछिती । ते ते निश्चितीं तो पुरवी ॥ ५४ ॥ अनिरुद्ध माझा निजसखा । शिवाज्ञा भक्ति केली उखा । बाणासुर तारिला देखा । साह्य चित्ररेखा नारदाज्ञा ॥ ५५ ॥ पूर्णांशें ब्रह्मस्थिती । वासुदेव मी आदिमूर्ती । लीलेनें तारिलें नेणों किती । तेथील निजभक्ती उद्धवार्जुनीं नांदे ॥ ५६ ॥ नव भक्ति नव मूर्ती । तेथील भक्तीची स्थिती । उद्धवा म्यां तुजप्रती । यथार्थगती सांगीतली ॥ ५७ ॥

बलवंतामध्यें जें अचाट मनोबल, धैर्यबल व शरीरबल असतें व ज्यायोगें तो किंचित्‌हि डगमगत नाहीं, तें धैर्य मी आहे. पुरुषोत्तम म्हणाला कीं, ज्यायोगें मजवरील प्रेम अनिवार वाढतें व भक्तांच्या कामनांचा नाश होतो, तें भक्तांतील भजन मीच आहें. ४४ भक्तांना पूजेसाठीं नऊ मूर्ति सांगितल्या आहेत, त्यांतील 'वासुदेव' ही जी पहिली मूर्ति, तो साक्षात् मीच आहें. ४५ त्या नऊजणांचीं नांवें ऐक. वासुदेव, संकर्षण, अनिरुद्ध, प्रद्युम्न, हयग्रीव, नारायण, वराह, वामन व नरसिंह ४६ अशीं त्या नऊ व्यूहांचीं नांवें आहेत. त्यांतील पहिली मूर्ति मी आहें व बाकीच्या आठहि मूर्ति माझ्या विभूति आहेत. ४७ असें हे उद्धवा! निश्चयानें जाण. त्यांतील हयग्रीव या वेदमूर्तीची भक्ति करून व्यासानें वेदव्यास पदाची प्राप्ति करून घेतली व त्रिभुवनांत कीर्ति गाजविली. ४८ नारायण ह्या माझ्या मूर्तीची भक्ति करून सृष्टिकर्त्यानें चतुःश्लोकानें ज्ञान प्राप्त करून घेतलें व तो ब्रह्मदेवाच्या पदाला प्राप्त झाला. ४९ श्वेतवराह या महामूर्तीची पृथ्वीनें पूर्ण भक्ति केली. तेव्हां त्या कृपामूर्तीनें तिला उद्धरून पूर्ण शांति दिली. ५० वामन ही माझीच मूर्ति होय. देवांनीं त्याचें पूर्ण भजन करून त्याला प्रसन्न करितांच त्यांना छळणाऱ्या बळीला त्यानें बांधून टाकिलें व देवांना त्याचा अधिकार देऊन त्यांचा सन्मान केला. ५१ प्रल्हादानें अनन्य भक्ति केल्यामुळें नरसिंहाची दिव्यमूर्ति प्रकट झाली व मी सर्व भूतांत रहाणारा सर्वात्मा आहें, असा लोकांना प्रत्यक्ष अनुभव आणून दिला ५२ ब्रह्मदेवाच्या आज्ञेनें संकर्षणाच्या श्रेष्ठ मूर्तीची रैवतक पर्वतानें भक्ति केली. आपली कन्या रेवती त्याला अर्पण करून तो स्वानंदस्थितींत शांत होऊन राहिला. ५३ सकामकामी लोकांनीं प्रद्युम्नाच्या काममूर्तीची भक्ति करून त्याला प्रसन्न करून घेतलें; त्यामुळें जे भक्त जी इच्छा करितात ती तो निश्चयानें पुरवितो. ५४ अनिरुद्ध तर माझा सखाच आहे. शंकराच्या आज्ञेनें उषेनें त्याची भक्ति केली व तिनें बाणासुराला तारिलें. नारदाच्या आज्ञेनें चित्रलेखेनें तिला साहाय्य केलें. ५५ ब्रह्मस्वरूपाची आदिमूर्ति मी वासुदेवच आहें. मी सहज लीलेनें कितीजणांचा उद्धार केला, त्यांची गणति नाहीं. त्या अवतारांतील माझी भक्ति अर्जुन व उद्धव या दोघांमध्येंच वास करीत आहे. ५६ हे उद्धवा! याप्रमाणें नऊ मूर्तींची नऊ प्रकारें भक्ति मीं तुला यथार्थपणें सांगितली. २५७.

विश्वावसुः पूर्वचित्तिर्गन्धर्वाप्सरसामहम् । भूधराणामहं स्थैर्यं गंधमात्रमहं भुवः ॥ ३३ ॥

ज्याचें गायन अतिअपूर्व । जो विश्वावसु गंधर्व । तो मी म्हणे माधव । ऐके उद्धव सावध ॥ ५८ ॥ नृत्य करूनि मनोहरा । सबाह्य सद्भावें सुंदरा । पूर्वचित्ती जे अप्सरा । ते मी म्हणे नोवरा भीमकीचा ॥ ५९ ॥ पर्वतांमाजीं जें स्थिरपण । तें मी म्हणे नारायण । पृथ्वीमाजीं जो गंध जाण । तो मी श्रीकृष्ण स्वयें म्हणे ॥ २६० ॥

अपां रसश्च परमस्तेजिष्ठानां विभावसुः । प्रभा सूर्येन्दुताराणां शब्दोऽहं नभसः परः ॥ ३४ ॥

उदकाच्या ठायीं सुरसू । तो मी म्हणे श्रीनिवासू । तेजिष्ठांमाजीं जो प्रकाशू । तो मी निजतेजांशू उद्धवा ॥ ६१ ॥ चंद्रसूर्य तारांच्या ठायीं । जें तेज तें माझें पाहीं । अनाहत शब्द तो मीहि । जो गगनासी कंहीं नातळे ॥ ६२ ॥

ब्रह्मण्यानां बलिरहं वीराणामहमर्जुनः । भूतानां स्थितिरुत्पत्तिरहं वै प्रतिसंक्रमः ॥ ३५ ॥

ब्राह्मणभजनीं बळीची थोरी । तो मी कृष्ण म्हणे निर्धारीं । ब्राह्मणभजन प्रेमें करी । मी बळीच्या द्वारीं द्वारपाळ ॥ ६३ ॥ नरावतारें अतिसंपन्न । पांडवामाजीं वीर अर्जुन । तो मी म्हणे नारायण । जीवप्राण तो माझा ॥ ६४ ॥ भूतांची उत्पत्ति स्थिती । ते मी म्हणे श्रीपती । भूतांसी जे प्रळयगती । तेही मी निश्चितीं उद्धवा ॥ ६५ ॥

गत्युक्त्युत्सर्गोपादानमानन्दस्पर्शलक्षणम् । आस्वादश्रुत्यवघ्राणमहं सर्वेन्द्रियेन्द्रियम् ॥ ३६ ॥

अहं गंधर्वाप्सरसां विश्वावसुः पूर्वचित्तिः—मी गंधर्वांतील विश्वावसु व अप्सरांतील पूर्वचित्ति आहें. अहं भूधराणां स्थैर्यं—मी पर्वतांतील स्थैर्य आहें. अहं भुवः गंधमात्रं—मी भूमीचा पुण्यगंध आहें. ३३.

ज्याचें गायन अति अपूर्व आहे, असा विश्वावसु गंधर्व मी आहें. उद्धवानें हें सावधान चित्तानें ऐकिलें. ५८ मनोहर नृत्य करून सुस्वभावानें अंतर्बाह्य सुंदर दिसणारी व मनाला मोहित करणारी जी पूर्वचित्ती अप्सरा, ती मीच आहें, असें रुक्मिणीचा पति श्रीकृष्ण म्हणाला. ५९ पर्वतांतील जो स्थिरपणा, तोहि मी नारायण आहें. पृथ्वींतील जो सुगंध, तोहि मीच आहें. २६०.

अपां च परमः रसः—आणि जलांतील मधुर रस मी आहें. तेजिष्ठानां विभावसुः—अति तेजस्वी पदार्थांतील सूर्य मी आहें. सूर्येन्दुताराणां प्रभा—सूर्य, चंद्र व तारे यांची प्रभा मी आहें. अहं नभसः परः शब्दः—आकाशाचा परा या नांवाचा शब्द मी आहें. ३४.

जलांतील मधुर रस मी आहें. तेजस्वी पदार्थांतील तेज मी आहें. ६१ चंद्र-सूर्य-नक्षत्रें यांच्यांत जें तेज असतें, तें माझेंच आहे. जो आकाशाला कधींहि स्पर्श करीत नाहीं तो अनाहत शब्द मीच आहें. २६२.

अहं ब्रह्मण्यानां बलिः—ब्राह्मणांचें आतिथ्य करणारांतील बलि मी आहें. वीराणां अर्जुनः अहं—वीरांतील अर्जुन मी आहें. भूतानां स्थितिः उत्पत्तिः प्रतिसंक्रमः अहं वै—प्राण्यांची उत्पत्ति, स्थिति व प्रलय मीच आहें. ३५.

ब्राह्मणांच्या भजनाविषयीं बळीची मोठी ख्याति आहे; तो बळी मीच आहें. मी बळीच्या दारांतील द्वारपाळ होऊन प्रेमानें हरीचें भजन करितों. ६३ नराचा अवतार व मला जीव कीं प्राण असलेला जो पांडवांतील वीर अर्जुन, तोहि मी नारायणच आहें. ६४ भूतांची उत्पत्ति, स्थिति व नाश हेंहि मीच आहें, असें हे उद्धवा, तूं निश्चयानें जाण. २६५.

अहं गति-उक्ति-उत्सर्गोपादानं आनंद-स्पर्शलक्षणं आस्वाद-श्रुत्यवघ्राणं सर्वेन्द्रियेंद्रियं—कर्मेंद्रियांचे गति, भाषण मलत्याग, ग्रहण व आनंद हे व्यापार, ज्ञानेंद्रियांचें स्पर्शज्ञान, रसज्ञान, शब्दश्रवण, रूपदर्शन व गंधज्ञान हे व्यापार आणि सर्वेंद्रियांतील आपापल्या विषयांचें ग्रहण करण्याची शक्ति मी आहें. ३६.

ज्ञान कर्म उभय इंद्रियें । त्या इंद्रियांचें मी इंद्रिय पाहें । त्यांची क्रिया जे जे आहे । ते माझेनि होये अभिव्यक्त ॥ ६६ ॥ गति ग्रहण गमन । उत्सर्ग आणि मोहन । दर्शन स्पर्शन घ्राण । श्रवण स्वादन माझेनी ॥ ६७॥ तें इंद्रियक्रियेचें चलन । तिळभरी नव्हे मजविण । ऐक त्याचेंही लक्षण । तुज मी संपूर्ण सांगेन ॥ ६८ ॥ मी मनाचेंही महामन । नयनाचेंही नयन । स्पर्शाचेंही स्पर्शन । जिव्हेची जाण निजजिव्हा ॥ ६९ ॥ मी घ्राणाचेंही निजघ्राण । श्रवणाचें आदिश्रवण । ग्रहणाचें निजग्रहण । गतीची जाण मी गती ॥ २७० ॥ मी आनंदाचा आनंदू । मी बुद्धीचाही प्रबोधू । सकळ इंद्रियांचा स्वादू । तो मी मुकुंदू उद्धवा ॥ ७१ ॥ मी वाचेची वाचा सावकाश । मी परेचाही परेश । सकळ इंद्रियांचा मी ईश । यालागीं हृषीकेश नांव माझें ॥ ७२ ॥

पृथिवी वायुराकाश आपो ज्योतिरहं महान् । विकारः पुरुषोऽव्यक्तं रजः सत्त्वं तमः परम् ॥ ३७ ॥

तत्त्वसंख्या पंचवीस । त्रिगुण घालितां अठ्ठावीस । ऐक त्यांचाही विलास । सावकाश सांगेन ॥ ७३ ॥ अहं महत्तत्त्व पंचतन्मात्रा । हा स्थूळ प्रकृतीचा उभारा । महाभूतेंद्रियें अकरा । हे षोडश विकारांची संख्या ॥ ७४ ॥ यांत मिळाल्या प्रकृतिपुरुष । तत्त्वसंख्यपंचवीस । प्रकृतीमाजीं गुणांचा वास । हा तत्त्वविलास तत्त्वांचा ॥ ७५ ॥ प्रकृति गुणविकार । तत्त्वसंख्या निर्धार । हा म्यां सांगीतला जो विचार । तें परात्पर स्वरूप माझें ॥ ७६ ॥

अहमेतत्प्रसंख्यानं ज्ञानं तत्त्वविनिश्चयः । मयेश्वरेण जीवेन गुणेन गुणिना विना ।
सर्वात्मनापि सर्वेण न भावो विद्यते क्वचित् ॥ ३८ ॥

ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें या दोन्ही इंद्रियांतील खरें इंद्रिय मीच आहें. त्या इंद्रियांची जेवढी क्रिया होते, तेवढी सगळी माझ्यामुळेंच प्रकट होते. ६६ गति, ग्रहण, गमन, मलोत्सर्ग, मोहन, दर्शन, स्पर्श, अवघ्राण, श्रवण व रसास्वाद हीं सर्व माझ्यामुळेंच होतात. ६७ माझ्यावांचून इंद्रियांची क्रिया तिळभरहि होत नाहीं. त्याचें लक्षण मी तुला पूर्णपणें सांगतों, ऐक. ६८ मी मनाचें महामन, नेत्रांचेंहि नयन, स्पर्शाचाहि स्पर्श, जिभेचीहि जीभ, ६९ नाकाचेंहि नाक, कानाचाहि कान, ग्रहणाचें ग्रहण, गतीचीहि मी गति आहे. २७० आनंदाचाहि आनंद, बुद्धीचा प्रकाशक, सगळ्या इंद्रियांचा स्वाद मी मुकुंदच आहें. ७१ मी वाणीचीहि वाणी, मी परावाणीचा प्रेरक, सगळ्या इंद्रियांचा ईश्वर, म्हणून मला हृषीकेश म्हणतात. २७२.

पृथिवी वायुः आकाशः आपः ज्योतिः अहं महान् विकारः पुरुषः अव्यक्तं रजः सत्त्वं तमः परम्— गंधतन्मात्र, स्पर्शतन्मात्र, शब्दतन्मात्र, रसतन्मात्र रूपतन्मात्र, अहंकार व महत्तत्त्व या सात प्रकृति-विकृति; पंचमहाभूतें व अकरा इंद्रियें मिळून सोळा विकार; जीव, प्रकृति; मिळून सांख्यशास्त्रोक्त पंचवीस तत्त्वें (याविषयीं 'मूलप्रकृतिर्विकृतिः' इत्यादि सांख्यकारिका प्रसिद्ध आहे.) तसेंच सत्त्व, रज व तम हे प्रकृतीचे गुण व परब्रह्म हें सर्व मीच आहें. ३७.

मूळ तत्त्वांची संख्या पंचवीस आहे. त्यांत सत्त्व रज-तम हे तीन गुण धरल्यास ती अठ्ठावीस होते. त्यांचा विस्तार मी तुला सांगतों, ऐक. ७३ अहंकार, महत्तत्त्व व पृथ्वी, वायु, आकाश, उदक, तेज हें पंचतन्मात्र हा प्रकृतीचा सामान्य विकार आहे. त्यापासून पुढें पंचमहाभूतें व अकरा इंद्रियें मिळून सोळा प्रकारचीं विशेष कार्यें होतात. ७४ त्यांत प्रकृति व पुरुष मिळविलीं म्हणजे एकंदर पंचवीस तत्त्वें होतात. प्रकृतीमध्यें गुण रहातात. असा हा तत्त्वांचा विस्तार आहे. ७५ प्रकृति व गुण यांच्या विकारांची तत्त्वसंख्या जी मीं सांगितली, तें माझेंच परात्पर स्वरूप आहे. २७६.

एतत् प्रसंख्यानं ज्ञानं तत्त्वविनिश्चयः अहं एव—ही तत्त्वांची गणना, त्यांचें लक्षपूर्वक ज्ञान व त्या ज्ञानाचें तत्त्व-निश्चयरूप फळ मीच आहें. (आतां हेंच संक्षेपतः सांगतात—) ईश्वरेण जीवेन गुणेन गुणिना सर्वात्मना सर्वेण अपि मया विना भावः क्वचित् न विद्यते—ईश्वर व जीव स्वरूपाचा द्विविध भाव तसाच गुण, गुणी व क्षेत्रक्षेत्रज्ञस्वरूपभाव, तो सर्वहि माझ्यावांचून कोठेहि विद्यमान नाहीं. [मीच सर्व आहें असा याचा भावार्थ.] ३८.

एवं पंचवीसतत्त्वव्याख्यान । तें अवघें मीचि जाण । या गणण्याचें गणितें ज्ञान । तेंही मी आपण म्हणे देवो ॥ ७७ ॥ हें जाणतें जें लक्षण । तेंहीं देवो म्हणे मी आपण । मजवेगळा अणुप्रमाण । सर्वथा जाण असेना ॥ ७८ ॥ जीव आणि ईश्वर । गुणी आणि गुणावतार । क्षेत्रक्षेत्रज्ञ निर्धार । सर्वही साचार मीचि मी ॥ ७९ ॥ मजवेगळें अणुमात्र । उरलें नाहीं गा स्वतंत्र । मी सर्वात्मा सर्वत्र । केवळ चिन्मात्र तेंही मी ॥ २८० ॥ मजवेगळें येथ कांहीं । उद्धवा गा उरलें नाहीं । सर्वसाधारण नाहीं । सर्वां देहीं असें मी ॥ ८१ ॥ उद्धवा ऐसें म्हणसी कांहीं । संक्षेपू न करावा पाहीं । विस्तारू न चले ये ठायीं । ऐक तेंही सांगेन ॥ ८२ ॥

संख्यानं परमाणूनां कालेन क्रियते मया । न तथा मे विभूतीनां सृजतोऽण्डानि कोटिशः ॥ ३९ ॥

पृथ्वीचिया परमाणुकणा । मी काळरूपें करीं गणना । परी विभूतिसंख्याप्रमाणा । माझेनिही जाणा न गणवती ॥ ८३ ॥ म्यां स्रजिले अनंत ब्रह्मगोळ । ते मज गणवतीना सकळ । मा विभूती माझ्या केवळ । कोण तोंडाळ गणूं शके ॥ ८४ ॥ मी सर्वज्ञ श्रीनारायण । माझ्या विभूति मज जाण । गणावया नाहीं आंगवण । मा निरूपण केवीं सांगे ॥ ८५ ॥ मनुष्यांमाजीं माझी विभुती । नांदतसे कोणे स्थितीं । ते खूण सांगेन तुजप्रती । ऐक निश्चितीं उद्धवा ॥ ८६ ॥

तेजः श्रीः कीर्तिरैश्वर्यं ह्रीस्त्यागः सौभगं भगः । वीर्यं तितिक्षा विज्ञानं यत्र यत्र स मेंऽशकः ॥ ४० ॥

श्रीकृष्ण म्हणाला कीं, याप्रमाणें पंचवीस तत्त्वांचें जें व्याख्यान तें सगळें मीच आहें व हें हिशोब करण्याचें गणिताचें ज्ञानहि मीच आहें. ७७ व तें गणित जाणण्याचें जें लक्षण तेंहि मीच आहें. माझ्यावांचून एक अणु एवढीहि जागा रिकामी नाहीं, असें खात्रीनें जाण. ७८ जीव-ईश्वर, गुण-गुणावतार, शरीर-आत्मा हीं सर्वहि मीच आहें. ७९ हे उद्धवा! मजवांचून एक अणुमात्र जागा स्वतंत्र नाहीं. सर्वत्र सर्वात्मा केवल चिन्मात्र मीच आहें. २८० माझ्याहून वेगळें असें येथें कांहींहि नाहीं. सर्वसाधारण देहांमध्यें मीच आहें. उद्धवा! ८१ तूं कदाचित् असें म्हणशील कीं, थोडक्यांत सांगूं नकोस, तर येथें विस्तार करून चालत नाहीं. त्याचेंहि कारण सांगतों, ऐक. २८२.

—हे भगवान्! तूं असा संक्षेपानें सामान्यतः विभूति कां सांगतोस! पूर्वीप्रमाणें निर्धारण व संबंध यांच्या योगानें सर्व विभूति विशेषतः कां सांगत नाहींस! म्हणून विचारशील तर सांगतो—

मया कालेन परमाणूनां संख्यानं क्रियते—मी पृथिव्यादिकांच्या परमाणूंचीहि संख्या दीर्घ कालानें निश्चित करून सांगूं शकेन. पण ती सुद्धां मलाच निश्चित करितां येईल. दुसऱ्या कोणाला तेंहि शक्य नाहीं; पण, **तथा कोटिशः अण्डानि सृजतः मे विभूतीनां (संख्यानं) न**—तशी कोट्यवधि ब्रह्माण्डें उत्पन्न करणाऱ्या माझ्या विभूतींची संख्या मलाहिं निश्चित करणें शक्य नाहीं. [कारण मी उत्पन्न केलेल्या ब्रह्माण्डांचीच संख्या जर अनिश्चित आहे, तर त्यांतील विभूतींची संख्या निश्चयानें कशी सांगतां येईल, असा याचा भावार्थ.] ३९.

पृथ्वीच्या परमाणुकणांची गणना मी काळरूपानें करितों. पण माझ्या विभूतींची संख्या मलाहि कळत नाहीं. ८३ मीं जें असंख्य ब्रह्माण्डगोल निर्माण केले आहेत, ते सगळे माझ्यानेंहि मोजवत नाहींत; मग दुसरा कोण गणितज्ञ ते मोजूं शकणार! ८४ मीं सर्वज्ञ नारायण असतां मलाहि जर माझ्या विभूतींची गणना करण्याची शक्ति नाहीं, तर मग मी त्यांचें निरूपण कसें करणार! ८५ आतां मनुष्यांमध्यें माझी विभूति कोणत्या स्वरूपानें रहाते, त्याची निश्चित खूण मी तुला सांगतों, ती हे उद्धवा! ऐक. २८६.

—तथापि माझ्या सर्व विभूति विशेषतः पण संक्षेपानें सांगतों त्या आतां ऐक—

यत्र यत्र तेजः श्रीः किर्तिः ऐश्वर्यं ह्रीः त्यागः सौभगं भगः वीर्यं तितिक्षा विज्ञानं सः मे अंशकः—जेथें जेथें प्रभाव, संपत्ति, कीर्ति, ऐश्वर्य, लज्जा, त्याग, आह्लादकत्व, भाग्य, बळ, सहनशीलता व विज्ञान असतें, तो माझा अंश आहे. ४०.

ज्याची प्रबळ प्रतापशक्ती । जेथ निरंतर लक्ष्मीची वस्ती । ज्यासी मर्यादा नाहीं संपत्ती । ज्याची उदार कीर्ति स्वधर्में ॥ ८७ ॥ ज्याच्या ऐश्वर्याची परमगती । आज्ञावर्ग नेमी त्रिजगती । ज्याची अनावर दानस्थिती । जेथ भाग्याची उत्पत्ती नीच नवी दिसे ॥ ८८ ॥ ज्याचें सामर्थ्य अतिदुर्धर । कोणी बोलों शकेना उत्तर । ज्याचें सौभाग्य मनोहर । आल्हादकर जननयनां ॥ ८९ ॥ ज्यासी सहनशीळतेची वोज । ज्यासी निंद्य कर्मांची लाज । जो विज्ञानाचें भोज । सहजेंचि निज नाचत ॥ २९० ॥ इयें लक्षणें जेथ वर्तती । तो जाण माझी विभूती । यांत एका लक्षणाची जेथ प्राप्ती । तेही विभुती पैं माझी ॥ ९१ ॥

एतास्ते कीर्तिताः सर्वाः संक्षेपेण विभूतयः । मनोविकारा एवैते यथा वाचाऽभिधीयते ॥ ४१ ॥

केवळ संकोच संक्षेपस्थितीं । म्यां सांगीतल्या ज्या बिभूती । त्या मनोविकारप्रतीती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ९२ ॥ साधकांचे साधनस्थितीं । सत्य जाणाव्या माझ्या विभूती । विचारितां परमार्थगती । तरी कल्पिती या मनोजन्या ॥ ९३ ॥ माझें स्वरूप अद्वैत जाण । नाहीं नाम रूप गुण वर्ण । तेथ नाना विभूतिलक्षण । मिथ्या जाण वाचिक ॥ ९४ ॥

वाचं यच्छ मनो यच्छ प्राणान् यच्छेन्द्रियाणि च । आत्मानमात्मना यच्छ न भूयः कल्पसेऽध्वने ॥ ४२ ॥

माझें स्वरूप नित्य निर्विकार । मनबुद्धिवाचा न कळे पार । तेथ बापुडीं इंद्रियें किंकर । प्राण निर्धारें तें नेणे ॥ ९५ ॥ यालागीं शमदमांच्या अनुक्रमीं । मनबुद्धिये वाचा नेमीं । प्राण नेमूनि प्राण-

---

ज्यांचा प्रताप केवळ अलौकिक असतो; ज्याच्यापाशीं अलोट संपत्ति असते; जेथें ऐश्वर्य निरंतर वास करितें; ज्याची स्वधर्मानें उदार कीर्ति असते; ८७ ज्याचा ऐश्वर्यप्रभाव त्रैलोक्यांत गाजत असतो; ज्याचा उदारपणा अमर्याद असतो; ज्याच्या भाग्याचा उत्कर्ष नवीन दिसतो; ८८ ज्याच्या विलक्षण सामर्थ्यापुढें कोणी शब्दहि उच्चारूं शकत नाहीं; ज्याचें अपार वैभव लोकांच्या डोळ्यांना आनंद देतें; ८९ ज्याला सहनशीलतेची आवड व निंद्य कर्मांची लाज वाटते; ज्याचें विज्ञानस्वरूप सहजच प्रकट होतें; २९० तात्पर्य हीं लक्षणें जेथें असतात, ती माझी विभूतीच आहे. यांतील एक लक्षणहि जेथें असेल तीहि माझीच विभूति आहे, असें तूं समज. २९१.

—या विभूतिकथनाचाच उपसंहार करितात—

एताः सर्वाः विभूतयः ते संक्षेपेण कीर्तिताः—या सर्व विभूति मीं तुला संक्षेपतः सांगितल्या. (मीं हे विभूतिभेद माझ्या ठिकाणीं चित्त स्थिर होण्यासाठीं कल्पिले आहेत; वास्तव त्यांविषयीं अत्यंत आग्रह धरूं नये, असें भगवान् सांगतात—) यथा वाचा अभिधीयते—ज्या प्रमाणें आकाशपुष्पादि पदार्थ केवळ वाणीनें बोलले जातात, ते वास्तविक नसतात, तथा एते मनोविकाराः—तसेंच हे सर्व विभूतिभेद कल्पित आहेत. [परमार्थतः नाहींत.] ४१.

उद्धवा ! मीं आपल्या विभूतींचें थोडक्यांत वर्णन करून सांगितलें. मनोविकाराच्या अनुभवानेंच त्या खरोखर जाणाव्या. ९२ साधकांच्या ज्या साधनस्थिति त्या सर्व माझ्याच विभूति समजाव्या. परमार्थगतीचा विचार करूं लागल्यास या विभूति मनःकल्पितच आहेत. ९३ वास्तविक माझें स्वरूप पूर्ण अद्वैतच आहे. त्याला नाम, रूप, गुण, वर्ण नाहीं. त्यांतील अनेक प्रकारचें विभूतिलक्षण मिथ्या म्ह० केवळ शाब्दिक आहे, असें समज. २९४.

—म्हणून तूं वागादिकांचें नियमन कर असें आतां सांगतात—

वाचं यच्छ—तूं वागिंद्रियाचें नियमन कर, मनः यच्छ—मनाचें नियमन कर. प्राणान् यच्छ—प्राणांचें नियमय कर, इंद्रियाणि च (यच्छ)—इंद्रियांचें नियमन कर. आत्मना आत्मानं यच्छ—सात्त्विक बुद्धीनें अंतःकरणाचें नियमन कर. भूयः अध्वने न कल्पसे—म्हणजे तूं पुनरपि संसारमार्गाला प्राप्त होणार नाहींस. ४२.

माझें स्वरूप नित्य, निर्विकार असल्यामुळें मन व बुद्धि यांस त्याचा अंत लागत नाहीं; तेथें बापडीं इंद्रियें तर काय निव्वळ चाकर; त्यांचा काय पाड ! त्यांना प्राणांचें नियमन करावयाचेंहि कळत नाहीं. ९५ म्हणून तर

धर्मीं । आत्मारामीं पावसी ॥ ९६ ॥ मनबुद्ध्यादि इंद्रियनेम । करावयाचें न कळे वर्म । ह्मणसी तरी तो अनुक्रम । ऐक सुगम सांगेन ॥ ९७ ॥ वाचा नेमावी माझेनी नामें । मन नेमावें ध्यानसंभ्रमें । प्राण नेमावा प्राणायामें । इंद्रियें दमें नेमावीं ॥ ९८ ॥ बुद्धि नेमावीं आत्मविवेकें । जीव नेमावा परमात्मसुखें । इतकेन तूं आवश्यकें । होसी कौतुकें मद्रूप ॥ ९९ ॥ मद्रूप झालियापाठीं । मग संसार न पडे दिठीं । खुंटल्या जन्ममरणांचिया गोठी । गमनागमन आटाआटी निमाली ॥ ३०० ॥ म्यां सांगीतल्या नेमपरिपाटीं । हा नेम करणें नाहीं ज्याच्या पोटीं । तो भोगी दुःखांचिया कोटी । ऐक ते गोठी सांगेन ॥ १ ॥

यो वै वाङ्मनसी सम्यगसंयच्छन् धिया यतिः । तस्य व्रतं तपो ज्ञानं स्रवत्यामघटाम्बुवत् ॥ ४३ ॥

म्यां सांगीतल्या नेमाचे निगुतीं । मनबुद्धिइंद्रियपंक्ती । जो नेमीना साक्षेपस्थिती । त्याचीं साधनें होती नश्वर ॥ २ ॥ त्याचें व्रत तप दान । योग याग शब्दज्ञान । काचे भांड्यांतील जीवन । तैशीं जाण नासती ॥ ३ ॥ जेवीं राखेमाजीं केला होम । कां अशौचें आचरला कर्म । कुपात्रीं दानधर्म । तैसा संभ्रम साधनां ॥ ४ ॥ उखरीं पेरिलें बीज । का गोळक आवंतिला द्विज । डोहळ्यांचे सोहळे भोगी वांझ । तैशी वोज साधनां ॥ ५ ॥ यापरी गा निश्चितीं । विध्युक्त नेम नाहीं चित्तीं । त्याचीं साधनें वृथा जाती । हातोहातीं उद्धवा ॥ ६ ॥ यालागीं मनादि इंद्रियवृत्ती । नेमाव्या यथानिगुतीं । हेंचि उद्धवाप्रती । स्वयें श्रीपति सांगत ॥ ७ ॥

शम-दमादिकांच्या पायरीपायरीनें मन, बुद्धि व वाक् यांचें नियमन करावें लागतें. प्राणधर्मांमध्यें प्राणांचें नियमन करून तूं आत्मस्वरूपाला प्राप्त हो. ९६ मन-बुद्धि इत्यादि इंद्रियांच्या नियमनाचें वर्म मला कळत नाहीं, असें जर म्हणशील तर तोहि अनुक्रम सोप्या रीतीनें सांगतों, ऐक. ९७ माझ्या नामस्मरणानें वाणीचें नियमन करावें. मनाला ध्यानांत गुंतवून त्याचें नियमन करावें. प्राणापानांनीं प्राणांचें नियमन करावें आणि दमानें इंद्रियांचें नियमन करावें. ९८ परमात्मचिंतनानें बुद्धीचें नियमन करावें. परमात्मसुखांत जीवाचें नियमन करावें. इतकें केलेंस कीं, तूं सहजच मद्रूप होशील; ९९ आणि एकदां मद्रूप झालास कीं संसार तुझ्या दृष्टीसहि पडणार नाहीं. जन्म-मरणाची वार्ता जागच्याजागीं खुंटेल. जा, ये, ही सगळी दगदग सहज नाहींशी होईल. ३०० मीं सांगितलेल्या नियमक्रमानें जो इंद्रियादिकांचें नियमन करावें असें कधीं मनांतहि आणीत नाहीं, तो दुःखाच्या राशी भोगितो. त्याविषयीं सांगतों, तें ऐक. ३०१.

—नियमन न करण्यांत दोष सांगतात—

यः वै यतिः धिया वाङ्मनसी सम्यक् अयच्छन्–जो संन्यासी आपल्या सात्त्विक बुद्धीनें वाक् व मन यांचें उत्तम प्रकारें नियमन करीत नाहीं, तस्य व्रतं तपः ज्ञानं आमघटाम्बुवत् स्रवति–त्याचें व्रत, तप व ज्ञान मातीच्या कच्च्या घटांतील जलाप्रमाणें विनाश पावतें. ४३.

मीं सांगितलेल्या नियमानें मन, बुद्धि व इंद्रियसमूह यांचें नियमन जे एकाग्रतेनें करीत नाहींत, त्यांचीं साधनें फुकट जातात. २ मातीच्या कच्च्या भांड्यांतून पाणी जसें गळून जातें, तसें त्यांचें व्रत, तप, दान, योग, याग, शब्दज्ञान हीं सर्व व्यर्थ होतात. ३ किंवा राखेमध्यें केलेला होम, शुचिर्भूत न होतां केलेलें कर्म, किंवा कुपात्रीं केलेला दान-धर्म जसा व्यर्थ, तसाच याच्या साधनांचा खटाटोप व्यर्थ आहे. ४ किंवा खडकाळ जमिनींत पेरलेलें बीज, किंवा गोळकाला केलेलें ब्राह्मणभोजनाचें निमंत्रण, किंवा वांझेच्या डोहाळ्याचे सोहाळे जसे फुकट, तशीच याच्या साधनांची गति होते. ५ हे उद्धवा! याप्रमाणें ज्यानें चित्तांत शास्त्रोक्त विधियुक्त नेम केला नाहीं, त्याचीं सर्व साधनें व्यर्थ जातात. ६ यास्तव मनादि-इंद्रियवृत्तींचें नियमन करावें, असें स्वतः श्रीकृष्णानें उद्धवाला सांगितलें. ३०७.

तस्मान्मनो वचः प्राणान् नियच्छेन्मत्परायणः । मद्भक्तियुक्तया बुद्ध्या ततः परिसमाप्यते ॥ ४४ ॥

मन बुद्धि इंद्रियें प्राण । अवश्य नेमावीं गा जाण । वृत्ति करोनि सावधान । माझें भजन जो करी ॥ ८ ॥ भावें करितां माझी भक्ती । विषयवासना जळोनि जाती । निर्विकल्प उपजे शांती । माझे भक्तिपंथीं चालतां ॥ ९ ॥ चालतां माझे भक्तिपंथीं । सकळ साधनें जळोनि जाती । भावें प्रकटें मी श्रीपती । करी संसारनिवृत्ति निजभक्तां ॥ ३१० ॥ हो कां माझिया निजभक्तां । संसारबाधेची व्यथा । ते लाज मज भगवंता । गांजूं निजभक्तां मी नेदीं ॥ ११ ॥ प्रल्हाद गांजितां जगजेठी । मी प्रकटलों कोरडें काष्ठीं । वैकुंठ सांडूनि उठाउठीं । गजेंद्रासाठीं पावलों ॥ १२ ॥ द्रौपदी गांजितां तत्काळीं । म्यां कौरवांचीं तोंडें केलीं काळीं । आगीनें गांजिता गोवळीं । म्यां प्राशिला ते काळीं दावाग्नी ॥ १३ ॥ गोकुळ गांजितां सुरपती । म्यां गोवर्धन धरिला हातीं । कीं गोपिकांची पुरवावया आर्ती । मी झालों श्रीपति कामारा ॥ १४ ॥ अर्जुनप्रतिज्ञेचे प्राप्ती । म्यां दिवसा लपविला गभस्ती । लावूनि जयद्रथासी ख्याती । सुभद्रापती वांचविला ॥ १५ ॥ अंबरीषाचे गर्भवास । म्यांचि सोशिले सावकाश । उणें आपुल्या निजभक्तांस । मी हृषीकेश येवों नेदीं ॥ १६ ॥ भक्तांचे पायींची माती । मी हृदयीं वाहें श्रीपती । वानरें वनचरें भावार्थी । म्यां आपुले पांतीं बैसविलीं ॥ १७ ॥ यालागीं उद्धवा पुढतपुढतीं । मी सांगें करावी माझी भक्ती । माझे भजनीं माझी प्राप्ती । अवलीळा पावती मद्भावें ॥ १८ ॥ मद्भावें करितां माझी भक्ती । मी अनंत आतुडें त्यांच्या हातीं । शेवटीं कामारा होय भक्तांप्रती । भक्तीची प्रीती मज ऐशी ॥ १९ ॥ माझिये भक्तीपरतें । सुगम साधन नाहीं येथें । हें जाणोनि म्यां तूतें । भजनपंथें लाविलें ॥ ३२० ॥ लाविल्या लागे सद्भक्ती । तैं संसार बापुडें तें किती । हेळसून चारी

तस्मात् मत्परायणः (सन्) मद्भक्तियुक्तया बुद्ध्या मनः वचः प्राणान् नियच्छेत्–म्हणून मत्परायण होऊन मद्भक्तियुक्त बुद्धीनें मन-वाक्-प्राण यांचें नियमन करावें. ततः परिसमाप्यते–म्हणजे पुरुष कृतकृत्य होतो. ४४.

मन, बुद्धि, इंद्रियें व प्राण यांचें अवश्य नियमन करावें. अशा प्रकारें जो वृत्ति सावधान ठेवून माझें भजन करितो, ८ व एकनिष्ठेनें माझी भक्ति करितो, त्याच्या विषयवासना जळून जातात. माझ्या भक्तिमार्गानें निर्विकल्प शांति प्राप्त होते. ९ माझ्या भक्तिमार्गानें गेलें असतां सगळीं साधनें जळून जातात. मजवर श्रद्धा ठेविली असतां श्रीहरी प्रकट होतो व माझ्या भक्तांच्या संसाराची निवृत्ति करितो. ३१० माझ्या भक्तांना जर संसारबाधेची व्यथा होऊं लागली, तर त्याची लाज मज भगवंताला असते. मी माझ्या भक्तांचा छळ होऊं देत नाहीं. ११ हे भक्तश्रेष्ठ उद्धवा ! प्रल्हादाला गांजलेलें पहातांच मी शुष्क खांबांतून प्रकट झालों. गजेंद्रासाठीं वैकुंठाहून धांवत आलों. १२ द्रौपदीचा छळ होतांच तिला गांजणाऱ्या कौरवांचीं तोंडें मीं काळीं केलीं. वणव्यानें गोकुळांतील गवळ्यांना पीडा देतांच तो वडवाग्नि मीं प्राशन केला. १३ ब्रह्मदेवानें गोकुळाला छळतांच मीं गोवर्धन पर्वत बोटावर उचलून धरिला. गोपिकांची इच्छा पूर्ण करण्यासाठीं मी कामासक्त झालों. १४ अर्जुनाची प्रतिज्ञा खरी करण्यासाठीं मीं दिवस असतानांच सूर्याला आच्छादित केलें व जयद्रथाचा नाश करून अर्जुनाला वांचविलें. १५ अंबरीषाचा गर्भवास मीं सुखानें सोशिला. मी हृषीकेशी आपल्या भक्तांकडे केव्हांहि गौणपणा येऊं देत नाहीं. १६ भक्तांच्या पायाची धूळ मी श्रीपति आपल्या हृदयावर धारण करितों. वानर व वनचर यांची भक्ति पहातांच मीं त्यांना आपल्या पंक्तीला बसविलें. १७ यास्तव हे उद्धवा ! मी तुला पुनः पुनः सांगतों कीं, माझी भक्ति करावी. माझें भजन केल्यानें माझे भक्त सहज मद्भावाला प्राप्त होतात. १८ श्रद्धेनें माझी भक्ति केली असतां मी अनंत सहज त्यांच्या हातीं सांपडतों व शेवटीं भक्तांचा काम करणारा होतों. इतकी मला भक्तीची आवड आहे. १९ माझ्या भक्तीसारखें सोपें दुसरें साधन नाहीं; हें जाणूनच मीं तुला भक्तिमार्गाला लाविलें. ३२० सद्भक्ति लावून घेतली कीं लागते व एकदां ती लागली कीं, मग तिच्यापुढें बापडा संसार तो काय ! माझे भक्त चारी मुक्तींना

मुक्ती । निजसुख भोगिती मद्भक्त ॥ २१ ॥ मद्भक्तांचें महिमान । अतिशयें अगम्य गहन । ऐसें बोलोनियां श्रीकृष्ण । उद्धवासी जाण कुरवाळी ॥ २२ ॥ तेणें श्रीकृष्णकराग्रस्पर्शें । उद्धवासीं झालें कैसें । व्याले धेनूचेनि वोरसें । वत्स जैसें उल्हासे ॥ २३ ॥ जे वीं कां लागता चंद्रकर । सबाह्य निवों लागे चकोर । मेघ देखोनि मयूर । नृत्यतत्पर स्वानंदें ॥ २४ ॥ यापरी उद्धव जाण । स्वानंदें झाला परिपूर्ण । विसरला देवभक्तपण । कृष्णही कृष्णपण विसरला ॥ २५ ॥ यापरी भक्तिसुखाआंत । दोघेही ऐक्यें झाले उन्मत्त । परमानंदाचा तेथ । धेंडा नाचत स्वानंदें ॥ २६ ॥ या भक्तिसुखाची गोडी । भाग्येंवीण न कळे फुडी । उद्धवभजनाचे कुळवाडी । जोडला जोडी श्रीकृष्ण ॥ २७ ॥ एका जनार्दना शरण । भजनसुखाची ऊणखूण । तो एक जाणे संपूर्ण । भक्तजीवनजिव्हाळा ॥ २८ ॥ जो निजभक्तांचा जिव्हाळा । तो गोकुळीं होऊनि गोंवळा । क्रीडोनि त्यांचिया खेळामेळा । गोपीगोपाळां उद्धरिलें ॥ २९॥ स्वयें खेळोनि त्यांचिया खेळा । उद्धरिलें बाळगोपाळां । हें नवल नव्हे त्याची कळा । उदार लीळा ते ऐका ॥ ३३० ॥ पर्वत पाषाण तृण तरुवर । भृंग मत्स्य मृग मगर । व्याघ्र वनचर विखार । पारावत मयूर आदिकरून ॥ ३१ ॥ येणेंसी समवेत । गोकुळींचे जीव समस्त । स्वयें उद्धरी श्रीकृष्णनाथ । कृपाळु समर्थ स्वलीला ॥ ३२ ॥ कां पितृवचनपुढारा । सीतेचिया वियोगद्वारा । रिसां आणि वानरां । उद्धरी निशाचरां रघुनाथ ॥ ३३ ॥ सेवेनें तारिले रीसवानर । युद्धें तारिले निशाचर । हें नवल कांहीं नव्हे थोर । ऐक उदार लीला त्याची ॥ ३४ ॥ अयोध्येपासून लंकेपर्यंत । मार्गीं वृक्षवल्ली पाषाण पर्वत । तृणादि जीव समस्त । उद्धरी रघुनाथ स्वलीला ॥ ३५ ॥ एवं नानावतारीं जनार्दन । यापरी उद्धरी सकळ जन । तेणें एका एकू केला पावन । हें नवल कोण मानावें ॥ ३६ ॥ परी नवल एक केलें मोटें ।

झिडकारून आत्मसुख भोगितात. २१ माझ्या भक्तांचा महिमा मोठा अतर्क्य, गहन आहे. असें बोलून श्रीकृष्णानें उद्धवाला कुरवाळिलें. २२ गाय व्याल्याबरोबर वासराला तिच्या पान्ह्यानें जसें सुख होतें, तसें श्रीकृष्णाच्या त्या हाताच्या स्पर्शानें उद्धवाला सुख झालें. २३ किंवा चंद्रकिरणांचा स्पर्श होतांच चकोर जसा आंतून-बाहेरून तृप्त होतो; किंवा मेघ पहातांच मोर जसा आनंदानें नाचूं लागतो. २४ तसा उद्धवाला आल्हाद झाला. याप्रमाणें उद्धव स्वानंदांत परिपूर्ण रंगला व कृष्णहि आपला कृष्णपणा विसरला. २५ अशाप्रकारें ते दोघेहि भक्तिसुखानें तल्लीन होऊन परमानंदाचा झेंडा घेऊन स्वानंदानें नाचूं लागले. २६ या भक्तिसुखाची गोडी भाग्यावांचून कोणाला कळत नाहीं. उद्धवानें भजनरूपी व्यापारांत श्रीकृष्णरूपी नफा मिळविला होता. २७ एकनाथ जनार्दनाला शरण गेला म्हणून त्याला भजनसुखाचें रहस्य पूर्णपणें कळलें व भक्ताच्या अंतःकरणांतील गुह्यहि समजलें. २८ जो भक्तांचा केवळ प्राणच अशा श्रीकृष्णानें गोकुळांत गवळी होऊन त्यांच्या बरोबर खेळी-मेळीनें क्रीडा करून त्यानें गोपी व गोपाळ यांचा उद्धार केला. २९ आपण त्यांच्याच बरोबर खेळ खेळून बाल-गोपाळांचा उद्धार केला, यांत कांहीं मोठेंसें आश्चर्य नाहीं. त्याची अपूर्व व उदार लीला वेगळीच आहे, ती ऐका. ३३० श्रीकृष्णनाथानें स्वतः पर्वत, पाषाण, गवत, झाडें, भृंग, मासे, हरिण, वाघ, वनांतील श्वापदें, सर्प, विंचू, पारवे, मोर यांसह ३१ गोकुळांतील सर्व जीवांचा आपल्या सामर्थ्यानें सहज लीलेनें उद्धार केला. ३२ किंवा रामावतारीं श्रीरघुनाथानें पित्याच्या वचनाचें निमित्त करून, सीतावियोगाचें कारण पुढें करून अस्वलें, वानर व राक्षस यांचा उद्धार केला. ३३ अस्वलें व वानर यांच्या सेवेमुळें उद्धार केला व युद्धाच्या निमित्तानें राक्षसांस तारिलें. यांत कांहीं विशेष नाहीं. तर त्याची उदार लीला वेगळीच आहे; ती ऐका. ३४ अयोध्येपासून लंकेपर्यंत मार्गांत जेवढे वृक्ष, वनस्पति, पाषाण, पर्वत, गवत व इतर सगळे जीव होते त्या सर्वांचा रघुनाथानें आपल्या लीलेनें उद्धार केला. ३५ अशाप्रकारें जो नाना अवतार धारण करणारा व सर्वांचाच उद्धार करणारा जनार्दन, त्यानें एकनाथालाहि पावन केलें, यांत आश्चर्य कसलें ! ३६ परंतु त्यानें एक फार मोठें आश्चर्य केलें आहे. मज मूर्खाच्या तोंडून हें श्रीभागवत

मज मूर्खाचे मुखावाटे । श्रीभागवतबोल केले मऱ्हाटे । हें आश्चर्य वाटे माझेंचि मज ॥ ३७ ॥ यालागीं एका जनार्दना शरण । ज्याची कृपा ऐशी परिपूर्ण । त्याचे स्मरोनि श्रीचरण । केला संपूर्ण सोळावा ॥ ३३८ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां विभूतियोगोनाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

अध्याय सतरावा.

श्रीगणेशाय नमः । ॐ नमो श्रीगुरु महामेरू । सूक्ष्मस्वरूपें तूं गिरिवरू । चैतन्यस्वभावें अतिथोरू । तूं आधारू सर्वांचा ॥ १ ॥ तुझ्या निजबोधाचीं शिखरें । वैकुंठकैलासादि अतिथोरें । तेथें ब्रह्माविष्णुमहारुद्रें । तुझेनि आधारें नांदिजे ॥ २ ॥ तुझिया आधारस्थितीं । नांदती त्रैलोक्यें लोकपंक्ती । सकळ भूतांची उत्पत्ति स्थिती । निदान अंतीं तुजमाजीं ॥ ३ ॥ सुरासुर लहानथोर । एक सौम्य एक क्रूर । इयें भूतें धरूनी निर्विकार । स्वरूप साचार पैं तुझें ॥ ४ ॥ तेथ विवेकाचे आगर । सच्चिदानन्दाचे रत्नाकर । तेथील लाधल्या कांकर । नीच ते थोर वेव्हारें होती ॥ ५ ॥ ज्याच्या औषधींचा

मराठींत बोलविलें. याचें मात्र माझें मलाच आश्चर्य वाटतें. ३७ यास्तव एकनाथ श्रीजनार्दनाला शरण आहे ज्याची अशी पूर्ण कृपा आहे, त्याच्या श्रीचरणांचें स्मरण करून हा सोळावा अध्याय समाप्त केला. ३३८.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित
टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील
विभूतियोग नांवाचा सोळावा अध्याय समाप्त झाला.

हे ॐकाररूपी श्रीगुरुराया ! तुला नमस्कार असो. तूं महामेरु पर्वत आहेस; परंतु तूं सूक्ष्मरूप असल्यामुळें कोणाला दिसत नाहींस. तरीहि चैतन्यस्वरूपानें अतिशय उंच असल्यामुळें तूं सर्वांचा आधार आहेस. १ तुझ्या आत्मज्ञानाचीं शिखरें वैकुंठ-कैलासाहूनहि फार उंच आहेत. ब्रह्मदेव विष्णु-महारुद्र हे तुझ्याच आधारानें तेथें नांदतात. २ तुझ्या आधारानेंच त्रैलोक्यादि अनेक भुवनें राहिलीं आहेत. सगळ्या भूतांची उत्पत्ति-स्थिति-क्षय यांचें मूळ कारण तूंच आहेस. ३ लहान-मोठे, सुर-असुर, कोणी सौम्य, कोणी क्रूर, अशीं अनेक प्रकारचीं भूतें धारण करूनहि तुझें स्वरूप निर्विकारच आहे. ४ तेथें विवेकाचें आगर व सच्चिदानंदरूपी रत्नांच्या खाणीच आहेत. त्यांतील एक जरी खडा हातीं आला तरी हीन मनुष्यहि मोठा व्यापारी बनतो. ५ त्याच्यावरील औषधींचा तर असा चमत्कार आहे कीं, त्यांचें सेवन करणारा तत्काल अजरामर होतो. त्या मेरुपर्वतांतून